प्रकरण तिसरे

# कराड ग्रामीण भागातील समस्यांचे स्वरूप

प्रकरण तिसरे

# करा‍ड ग्रामीण भागातील समस्यांचे स्वरूप

३.१ प्रास्ताविक

३.२ कराड : ग्रामीण भागातील समस्यांचे स्वरूप

३.३ कराड नगरपरिषद हद्दीमध्ये समावेशाचे राजकारण समस्या

३.४ कराड नगरपरिषद हद्दीत समावेशाच्या विरोधाचे राजकारण

३.५ विधानसभा निवडणूकीमध्ये विकासाचे बाबतीत आमदारांची भूमिका

३.६ जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांची भूमिका

३.७ मलकापूर ग्रामपंचायतीची भूमिका

३.८ १२ सर्व्हे नंबर्स मधील नागरिकांची भूमिका

३.९ कराड ग्रामीणमध्ये सुविधा पुरविण्यासाठी पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, आमदार, खासदार यांनी केलेले कार्य.

३.१० कराड ग्रामीण भागातील नागरी सुविधांचा प्रश्न- निष्कर्ष.

३.११ संदर्भ

प्रकरण तिसरे

# कराड ग्रामीण भागातील समस्यांचे स्वरूप

## ३.१ प्रास्ताविक -

या प्रकरणामध्ये कराड ग्रामीणचा नगरपरिषद हद्दीमध्ये समावेशाचे राजकारण व विरोधाचे राजकारण, विविध राजकीय पक्षांच्या भूमिका, तसेच कराड ग्रामीण मधील समस्या दूर करून तेथील जनतेचे जगणे सुसह्य करण्याच्या उद्देशाने कराड नगरपरिषद, पंचायत समिती, जिल्हा परिषद, आमदार व खासदार यांच्या स्थानिक विकास निधीतून केलेल्या विकासकामांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

कराड ग्रामीणमधील जनतेला सुखी आणि संपन्न करण्यासाठी विकासनिधी बरोबरच इतरही पर्याय उपलब्ध आहेत. परंतु यापैकी कोणताही पर्याय निवडण्यासाठी आवश्यकता असते ती "जबरदस्त इच्छाशक्ती" परंतु नेमकी हीच इच्छाशक्ती इथे उपलब्ध नसलेने कराड ग्रामीणचा विकास खोळंबला आहे. या भागाचा कराड नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये समावेश करणे, कराड, मलकापूर, कार्वे, गोळेश्वर इ. गावांच्या हद्दींमध्ये त्यांच्या जवळच्या भागांचा समावेश करणे किंवा कराड ग्रामीणसाठी संपूर्ण भागाला स्वतंत्र महसुली स्वयंशासनाची (स्थानिक स्वराज्य संस्था) स्थापना करणे इ. असे काही पर्याय उपलब्ध आहेत.

कराड नगरपालिका साधारण १९६१ पासून या भागाचा समावेश कराड हद्दीत व्हावा. यासाठी प्रयत्नशील आहे. याचा अर्थ साधारण ४५ वर्षांच्या प्रयत्नांना ज्यावेळी यश येत नाही त्यावेळी या समस्येचा वेगळ्या अंगाने अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. कराड ग्रामीणच्या विकासाकरिता वर सांगितलेल्या सर्व मार्गांमध्ये या भागाचा कराड नगरपरिषद हद्दीमध्ये समावेश करणे हा त्यातील सर्वात उत्कृष्ठ मार्ग असल्याचे जाणवते. परंतु या मार्गात अनेक अडथळे आहेत. यासर्व बाबींच्या मुळाशी जाऊन कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न केल्यास अनेक गोष्टींचा उलगडा होतो. निव्वळ-

राजकारण, स्वार्थ, कुरघोडी, विरोधासाठी विरोध, अशा अनेक बाबी समोर येतात. त्यालाच पुन्हा विकासाचे राजकारण, कल्याणाचे राजकारण असे गोंडस नाव देऊन काल हरण चालू असते. परंतु या सर्व घडामोडीत मध्यवर्ती ठिकाणी असणारा "माणूस" मात्र चोहोबाजूंनी भरडला जातो. हे चित्र आज सर्व ठिकाणी दिसून येते. कराड ग्रामीणचा प्रश्नदेखील काहीसा याच प्रकारचा आहे. त्यामुळेच कराड ग्रामीणचा प्रश्न या वैश्विक समस्येला अपवाद आहे असे वाटत नाही.

## ३.२ कराड : ग्रामीण भागातील समस्यांचे स्वरूप -

कराड ग्रामीण हा त्रिशंकू किंवा अधांतरी असलेला भाग आहे. येथे कोणत्याही प्रकारची जबाबदार विकास यंत्रणा अथवा स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्त्वात नाही. त्यामुळे या परिसरावर कोणाचेही नियंत्रण नाही. ही एक बाजू तर दुसरी बाजू अशी, दिवसेंदिवस कराड ग्रामीणमधील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. घरांची संख्या वाढत आहे आणि त्या अनुषंगाने कराड ग्रामीणमधील समस्या अधिकाधिक उग्र रूप धारण करीत आहेत.

कराड ग्रामीणचे नगरपालिकेतील समावेशाचे राजकारण कित्येक वर्षे चालू आहे. नजिकच्या काळात तरी ही समस्या सुटेल अशी शक्यता नाही. कराड ग्रामीण मधील जनता मात्र या आशेवर टिकून आहे. नगरपरिषद तसेच इतर संस्थाकडून मिळणाऱ्या सेवा भरमसाठ पैसे भरून घ्याव्या लागतात. एकीकडे आर्थिक हालाखीमध्ये होरपळणारा हा नागरिक या नागरी सुविधा मिळवताना त्याची दमछाक होते.

कराड नगरपरिषदेकडून कमी प्रमाणात व कमी दाबाने पाणी पुरवठा होणे आणि त्यासाठी वर्षाकाठी मोजावे लागणारे रू.२२२०/- हा दर कराड शहरवासियांपेशा जवळजवळ अडीचपट अधिक आहे. तरी सुद्धा इथला माणूस ते मुकाटपणे स्विकारतो. घरातून बाहेर पडणारे मलमूत्र आणि सांडपाण्याचे घराच्या दारातच डबके

साठलेले असते. त्यावर डास, माशा आणि रोगजंतूंचे साम्राज्य असते. परिणामी घरातील लहान मुले, महिला यांना विविध साथीच्या रोगांना बळी पडावे लागते. यावर उपाययोजना नाहीच. रात्री सोडाच परंतू संध्याकाळच्या वेळी सुद्धा पथ दिव्यांअभावी महिला आणि तरूणींचे बाहेर पडणे मुष्किल बनले आहे आणि त्यामुळे आपोआपच "सातच्या आत घरात" हा अलिखित नियम घराघरांमध्ये स्थापित झालेला दिसतो.

झोपडपट्टयांमधील गैरसाईंनी कहर केलेला आहे. झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांचे जीवन नरक समान तर आहेच. परंतु या ओंगळवाण्या झोपडपट्टयांनी रस्त्यांवर भयंकर मोठ्या प्रमाणात आक्रमण केल्यामुळे सर्वसामान्य लोकांच्या जीवनात देखील नरक यातना पहावयास मिळतात. रस्ते बांधणी आणि दुरूस्तीचे कोणतेही प्रयोजन नसल्याने नागरिकांना कधी दुसऱ्यांच्या प्लॉटमधून, गटरांवरून, बांधावरून, कब्रस्थानमधून, कचऱ्याच्या ढिगाऱ्यांवरून, ऑक्सिडेशन पॉंड्स वरून मार्गक्रमण करावे लागते.

शाळा, महाविद्यालये जवळपास नसल्यामुळे कित्येक अंतर लहान मुलांपासून, महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतरांना पायीच कापावे लागते. या त्रासाला कंटाळून शाळेतील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर, गुणवत्तेवर परिणाम होतो. शाळेतील गळती वाढते. मुला-मुलींचे शाळा सोडण्याचे प्रमाण वाढते. त्याचाच परिणाम म्हणून बेकार तरूणांचे तांडे, अकुशल कामगार आणि गुन्हेगारीमध्ये वाढ होते. अवैध व्यवसायांना चालना मिळते.

घरे बांधणीवर नियंत्रण करणारी, नियोजन करणारी कोणतीच यंत्रणा नसल्यामुळे ज्याला जसे सुचेल तसे व तेवढे घरे बांधून झोपडपट्टीवजा घरांच्या वस्त्या निर्माण होत आहेत. घरांना वायुविजन आणि प्रकाश, आसपास खेळती हवा त्याकरीता मोकळी जागा परसबाग, दारात छोटेसे कुंपण, फळा फुलांचे झाड इ. गोष्टी स्वप्नवत वाटाव्या एवढ्या दुर्मिळ बनलेल्या आहेत. त्यातूनच पर्यावरण आणि प्रदूषणाचा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे.

अशा अनेक समस्यांमधून वाट काढत कराड ग्रामीणमधील नागरीक आपले जीवन जगत आहे. वाट्याला येणाऱ्या यातना भोगत आहेत. या यातनांमधून मुक्ती देणारा कोणीच नसल्यामुळे शक्य तेवढे स्व-कमाईतूनच आपले जीवन सुसह्य करण्याचा प्रयत्न करीत आहे.

## ३.३ कराड नगरपरिषद हद्दीमध्ये समावेशाचे राजकारण समस्या -

कराड ग्रामीणचा कराड नगरपरिषद हद्दीमध्ये समावेश होऊ नये अशी विचारधारा परिसरात एखादा अपवाद वगळता कोठेच दिसून येत नाही. कराड परिसरातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, राजकारणी, व्यावसायिक, नोकरवर्ग, व्यापारी या सर्वांना कराड ग्रामीणचा कराड नगरपरिषद हद्दीमध्ये समावेश व्हावा असेच वाटते. कराड उत्तरचे आमदार श्री. बाळासाहेब पाटील यांनी विधानसभा निवडणूकीच्या प्रचारसभांमध्ये अनेक वेळा या गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. कराड नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष श्री. पी.डी. पाटील यांनी तर अनेक वर्षे या प्रश्नाचा पाठ पुरावा करून हा परिसर कराड शहर हद्दीमध्ये समाविष्ट व्हावा म्हणून प्रयत्न केले आहेत.[१] किंबहुना श्री. पी.डी.पाटील यांच्या नगराध्यक्षपदाच्या कारकिर्दीतच या प्रश्नाचा जास्तीत जास्त सोडवणूकीसाठी प्रयत्न झालेला दिसतो. कराड मतदारसंघाचे संसदेत प्रतिनिधित्व करणारे खासदार श्री श्रीनिवास पाटील यांनीदेखील हीच भूमिका मांडलेली आहे. लोकसभा निवडणूकीच्या वेळी त्यांनी हा विषय मांडला आहे. सद्या हा प्रश्न न्यायप्रविष्ठ असल्याने समावेशाच्या बाबतीतील प्रक्रिया प्रलंबीत असली तरी खासदार विकास कार्यक्रमांतर्गत त्यांनी बरीच विकासकामे मार्गी लावली आहेत. यापरिसराचा विकास करण्यासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य, श्री. गोपाळराव धोकटे यांनीदेखील प्रयत्न केले आहेत.[२] नगरपालिकेला या भागाच्या विकासाकरिता मर्यादा पडतात त्यामुळे श्री. पी.डी.पाटील यांनी श्री. गोपाळराव धोकटे यांना जिल्हा परिषदेच्या माध्यमातून या परिसराचा विकास करा अशा सूचना दिल्या.[३] तसेच विद्यमान पंचायत

समितीच्या सदस्या, श्रीमती रसाळ यांनी देखील हा परिसर कराड नगरपरिषद हद्दीमध्येच समाविष्ठ व्हावा अशी भूमिका मांडलेली आहे.[४]

कराड ग्रामीण हा भाग कराड शहर हद्दीलगत आहे. तसेच कराड नगरपरिषदेमार्फत अनेक सोई-सुविधा या भागाकरिता आजपर्यंत पुरविलेल्या आहेत. नळपाणी, भुयारी गटार यासारख्या सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. नगरपरिषद हद्दीलगत असलेला त्रिशंकू भाग नगरपरिषद हद्दीमध्ये तातडीने समाविष्ठ करण्यात यावा असे शासनाचे परिपत्रक आहे.[५] तसेच या समावेशाला ठामपणे कोणीही विरोध केलेला नाही. त्यामुळे हा परिसर कराड शहर हद्दीमध्ये समाविष्ट करण्यास काहीच हरकत नाही. ज्या लोकांनी विरोध केलेला आहे किंवा हरकती घेतलेल्या आहेत त्यांना कराड ग्रामीणचा भाग शहर हद्दीत समाविष्ठ करण्याच्या प्रक्रियेला विरोध नाही तर ही शहर हद्दवाढ होत असताना लगतच्या काही ग्रामपंचायत हद्दींमधील असा काही भाग बाधीत होत होता की, ज्यामुळे त्या ग्रामपंचायतीचे कर रूपाने मिळणारे उत्पन्न बुडते व ग्रामपंचायतींचा विकास थांबू शकतो. या भीतीपोटीच काही लोकांनी या प्रक्रियेला आव्हान दिले आहे. त्यांचा कराड ग्रामीणचे कराड शहर हद्दीत समावेशाला विरोध नाही.

दि. २१ जुलै, १९८९ रोजी जाहीर झालेल्या कराड शहर हद्दवाढीच्या संदर्भात ज्या याचिका उच्च न्यायालयात दाखल झाल्या. त्यामध्ये मलकापूर, सैदापूर, बनवडी आणि विरवडे या ग्रामपंचायतींचा समावेश होता. कारण ही शहर हद्दवाढ अतिशय व्यापक स्वरूपाची होती. तसेच या हद्दवाढीमध्ये संपूर्ण सैदापूर हे गाव, संपूर्ण मलकापूर हे गाव, बनवडीचा काही भाग तसेच विरवडे ग्रामपंचायतीच्या हद्दीतील एम.एस.ई.बी. इंडस्ट्रियल एरीया, ओगळे काच कारखाना इ. भाग समाविष्ट करण्यात आला होता. यामुळे मलकापूर आणि सैदापूर या दोन गावांचे असलेले स्वतंत्र अस्तित्त्व धोक्यात येत होते. बनवडी व विरवडे या ग्रामपंचायतींना कर रूपाने हमखास उत्पन्न देणारा भाग ग्रामपंचायत हद्दीपासून तोडला जाणार होता व त्यामुळे त्या

ग्रामपंचायतींचे उत्पन्न बुडून आर्थिक अरिष्ठ कोसळणार होते. किंबहुना उत्पन्नाअभावी ग्रामपंचायतीचे अस्तित्त्व संपले असते, विकास करता आला नसता ही एक भीती विरोध करणाऱ्यांच्या मनात होती.[६] स्वतःचे स्वतंत्र राजकीय अस्तित्त्व धोक्यात येण्याची भीतीदेखील त्यांच्यामध्ये मनामध्ये असावी.[७] तसेच शहर हद्द वाढ करताना शेजारच्या एखाद्या ग्रामपंचायतीचा विशिष्ट भाग तोडून न घेता संपूर्ण गाव हद्दीत समाविष्ठ करावे असा नियम आहे.[८] त्यामुळे कराड शहर हद्दवाढीस आव्हान दिले गेले. त्यामध्ये कराड ग्रामीणच्या शहर हद्दवाढीत समावेशाला त्यांचा विरोध नव्हता.याचाच अर्थ कराड शहर हद्दवाढीला ज्यांनी विरोध केला त्याची कारणे निराळी होती. त्रिशंकू भागाचा कराड शहरहद्दीत समावेशाला त्यांचे पूर्ण समर्थन असलेले दिसते.

कराड ग्रामीणचे कराड शहर हद्दीत समाविष्ट करण्यासंदर्भात दोन विचारधारा दिसून येतात. या दोन्ही विचारधारा राजकीय पक्षाधिष्ठीत नसल्या तरी ढोबळमानाने विचार केल्यास भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेस या दोन प्रमुख राजकीय पक्षांच्या दोन परस्पर भिन्न भूमिका असल्याचे जाणवते. कराड ग्रामीण मधील त्रिशंकू भागाचा समावेश कराड नगरपरिषद हद्दीमध्ये झाला पाहिजे. अन्यथा या भागाचा विकास होणार नाही. कारण नगरपालिकेचा विकास कामाचा आवाका मोठा असतो. नगरपालकेला उत्पन्नाची साधने विपुल प्रमाणात असतात. विविध शसकीय योजनांच्या माध्यमातून मिळणारा निधी मोठ्या प्रमाणात असतो. नगरपरिषदेकडे मोठ्या प्रमाणात कर्मचारी, मनुष्यबळ, साधनसामुग्री, तंत्रज्ञान उपलब्ध असते. त्यामुळे कराड ग्रामीणचा समावेश कराड पालिका हद्दीमध्येच झाला पाहिजे. ही भूमिका राष्ट्रवादीचे नेते माजी नगराध्यक्ष श्री. पी.डी.पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य, गोपाळराव धोकटे, विद्यमान पंचायत समिती सदस्या श्रीमती रसाळ यांनी मांडली. तसेच विद्यमान आमदार बाळासाहेब पाटील व विद्यमान खासदार, श्री. श्रीनिवास पाटील यांनी देखील निवडणूकीच्या प्रसंगी याच भूमिकेचे समर्थन केलेले आहे. तसेच त्यादृष्टीने प्रयत्न

देखील केले आहेत. ही सर्व नेतेमंडळी राष्ट्रवादी पक्षाची नेते आहेत. त्यामुळे कराड ग्रामीणच्या विकासाला चालना द्यायची असेल तर या त्रिशंकू भागाचा कराड शहरहद्दीमध्येच समावेश करावा. वेगळे स्वयंशासन घेऊन या परिसराचा विकास होणे शक्यच नाही. असे राष्ट्रवादी काँग्रेसचे मत दिसते.

सन २००१ च्या जनगणनेनुसार या परिसरात ६८७१ एवढे मतदार राहतात. विधानसभा, लोकसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती या निवडणूकांमध्ये हा भाग निर्णायक भूमिका घेऊ शकतो. सद्या कराड उत्तर विधानसभा मतदार संघ राष्ट्रवादी पक्षाकडे आहे. नगरपरिषदेची सत्ता देखील राष्ट्रवादी गटाकडे आहे. कराड लोकसभा मतदार संघ हा देखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे आहे. तसेच पंचायत समितीचा गण देखील राष्ट्रवादी काँग्रेसनेच जिंकलेला आहे. त्यामुळे राजकीय व्यूहरचनेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आघाडी घेतलेली आहे. जर कराड ग्रामीणचा त्रिशंकू भाग नगरपालिका हद्दीत समाविष्ट झाला तर या भागातील ६८७१ मतदार नगरपरिषदेच्या हद्दीत वाढतील व त्याचा राजकीय फायदा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला होईल व पक्षरचना अधिक बळकट करता येईल. सर्व ठिकाणी राजकीय सत्ता प्राप्त करून सत्तेचे राजकारण करण्याची इच्छा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची दिसते.

सत्ता प्राप्त झाल्यामुळे पक्षातील कार्यकर्त्यांना विविध पदे वाटता येतात. त्यांना समाधानी बनवता येते व त्या माध्यमातून पुन्हा सत्ता प्राप्तीसाठी मार्ग रिकामा होतो. तसेच कराड ग्रामीणचा त्रिशंकू भाग आपली सत्ता असताना नगरपालिका हद्दीत समाविष्ट झाला तर त्याचे श्रेयदेखील आपल्या पक्षाला मिळेल. त्या परिसराची रचना आपल्या मनाप्रमाणे करता येईल व त्याचा लाभ कायमस्वरूपी घेता येईल अशी भावना दिसते.

### ३.४ कराड नगरपरिषद हद्दीत समावेशाच्या विरोधाचे राजकारण -

कराड नगरपरिषदेच्या एकंदर शहर हद्द वाढीला विरोध करणे आणि कराड ग्रामीणच्या त्रिशंकू भागाचा कराड नगरपरिषद हद्दीमध्ये समाविष्ठ करणेबाबतचा

निर्माण झालेला प्रश्न या दोन्ही समस्यांचे स्वरूप परस्पर भिन्न असल्याचे दिसून येते. हे दोन्ही प्रश्न परस्पर भिन्न असले तरी परस्परांना पूरक आहेत. किंबहुना एक प्रश्न सोडविण्याच्या प्रयत्नात दुसऱ्या प्रश्नाचा जन्म झालेला आहे. तर दुसरा प्रश्न सोडविण्याच्या प्रयत्नात पहिला प्रश्न भिजत पडलेला आहे. असा काहीसा विचित्र प्रकार इथे घडलेला दिसतो.

कराड नगरपरिषद शहर हद्द वाढीसाठी १९६१ पासून प्रयत्नशील आहे. कराड शहर हद्दीलगत काही अनियंत्रित व गलिच्छ वस्त्या निर्माण झालेल्या होत्या त्यांचा विकास व्हावा या उद्देशाने टाऊन प्लॅनिंग आणि हद्दवाढीला पर्याय नव्हता. तेथील लोकांना सुविधा मिळाव्या याच स्वच्छ आणि व्यापक भूमिकेतून कराड शहर हद्द वाढीच प्रस्ताव नगरपालिकेने सरकारकडे पाठविला होता. तो प्रस्ताव मंजूर होऊन जी.आर. देखील निघाला होता.[१] परंतू शहरहद्द वाढीस हरकती उपस्थित करून व उच्च न्यायालयात याचिका दाखल करून विरोध करण्यात आला. परिणामी कराड ग्रामीणचा भाग आजअखेर प्रलंबीत पडला.

कराड नगरपरिषद हद्दवाढीची घोषणा १९७६, १९८७, २००१ अशी तीन वेळा करण्यात आली. १९७६ साली पहिल्यांदा झालेल्या उद्घोषणवेर सूचना/हरकती मागविणेत आल्या. त्यासही काही वर्षे उलटली. या मध्यंतरीचे काळात अनेक वर्षे गेल्याने, सन१९८७ साली पुन्हा दुसऱ्यांदा तीच उद्घोषणा नव्याने प्रसिद्ध केली गेली. व हरकती/सूचना मागविणेत आल्या. हरकती सूचनांची सुनावणी होऊन अखेरीस २०/६/८९ रोजी नगरपरिषदेच्या हद्दवाढीची अंतिम अधिसूचना निर्गमीत करण्यता येऊन हद्द वाढीच्या अंमजबजावणीची दि. २१ जुलै १९८९ प्रसिद्ध करण्यात आली. तथापि या शहर हद्दवाढीच्या अंमलबजावणी पूर्वीच मलकापूर ग्रामपंचायत, सैदापूर ग्रामपंचायत, बनवडी ग्रामपंचायत व विरवडे ग्रामपंचायत यांनी चार स्वतंत्र याचिका उच्च न्यायालयात दाखल केल्या. ४/४/१९९० रोजी उच्च न्यायालयाने याचिकाधारकांचे म्हणणे ऐकून शहरहद्दवाढीच्या अधिसूचनेस स्थगिती दिली. परंतु त्या

आदेशत हरकती धारकांना सुनावणी देऊन निर्णय घेण्याचा अधिकारी शासनास दिलेला होता. त्यानुसार नगरविकासमंत्री, मा. श्री. अरूण गुजराथी यांनी सुनावणी देऊन निकालही पारीत केला. दरम्यानच्या कालावधीत मलकापूर 'क' वर्ग नगरपरिषद स्थापनेचा प्रस्ताव सादर केल्याने नगरपरिषद हद्द वाढीच्या प्रस्तावाला खो बसला. अखेरीस कराड नगरपरिषदेच्या हद्दवाढीची अधिसूचना आणि मलकापूर ग्रामपंचायत स्थापनेचा प्रस्ताव शासनाने एका अधिसूचनेद्वारे रद्द केला. त्यामुळे पुन्हा शहरहद्द वाढ खोळंबली आणि कराड ग्रामीणचा त्रिशंकू भाग पुन्हा अधांतरी राहिला.

शहर हद्दवाढीच्या वरीलप्रमाणे नगरपरिषदेने प्रयत्न आणि संघर्ष केला आणि शेवटी व्यापक आणि विस्तीर्ण अशा शहर हद्दवाढीचा नाद सोडून फक्त कराड ग्रामीण या त्रिशंकू भागापुरता मर्यादित हद्दवाढीचा प्रस्ताव नगरपरिषदेने सादर केला. या शहर हद्दवाढीची घोषणा दि. ६ सप्टेंबर, २००१ रोजी प्रसिद्ध करण्यात येऊन हरकती सूचना मागविणेत आल्या. मलकापूर ग्रामपंचायतीने कराड ग्रामीणमधील बारा सर्व्हे नंबर्स शहर हद्द वाढीमधून वगळावेत अशी हरकत घेतली. ते १२ सर्व्हे नंबर्स खालीलप्रमाणे- ३९९,४०६, ४०७, ४०८, ४०९, ४१०, ४१५, ४१६, ४१७,४२१, ४२२, ४२३ असे एकूण १२ सर्व्हे नंबर्स वगळण्याची मागणी केलेली आहे. यावर सुनावणी होऊन कार्यवाही प्रलंबीत आहे.

दरम्यानच्या काळात मलकापूर नगरपंचायतीची उद्घोषणा झालेली आहे. या उद्घोषणेमध्ये उपरोक्त १२ सर्व्हे नंबर्सचा समावेश असल्याचे दिसते. सदर उद्घोषणेवर कराड नगरपरिषदेने हरकत घेऊन वरील १२ सर्व्हे नंबर्स वगळून मलकापूर नगरपंचायतीची उद्घोषण केल्यास हरकत नसल्याचे स्पष्ट केले आहे व तो पर्यंत मलकापूर नगरपंचायतीची उद्घोषणा त्वरीत रद्द करण्यीच मागणी केलेली आहे.

वरील सर्व घटना घडामोडीमध्ये कराड ग्रामीणचा भाग अधांतरीच राहत गेला आहे.

सुरूवातीला कराड शहर हद्दवाढीस जो विरोध झाला. त्याचे स्वरूप वेगळे होते. ती शहर हद्दवाढ व्यापक स्वरूपाची होती. त्यामध्ये मलकापूर गाव, सैदापूर गाव, बनवडी, विरवडे या गावांना फटका बसता होता. त्यातील मलकापूर आणि सैदापूर दोन्ही गावांचे अस्तित्त्व नष्ट होत होते. तर बनवडी आणि विरवडे या दोन गावांना वार्षिक घसघसीत कररूपाने उत्पन्न देणारा परिसर कराड हद्दीत जात होता. त्यातून त्यांची अर्थव्यवस्था धोक्यात येत होती व गावचा विकास थंडावला असता. तसेच शहरहद्द वाढीत एखाद्या गावाचा विशिष्ट भाग तोडून तो सामील करता येत नाही असा नियम आहे. अशी कारणे पुढे करून शहर हद्द वाढ रोखली गेली.

दुसऱ्यांदा ६ सप्टेंबर, २००१ रोजीच्या शहर हद्द वाढीवर हरकत घेताना कराड ग्रामीणमधील १२ सर्व्हे नंबर्स वगळावेत असे स्पष्ट केले. याची कारणे देताना ग्रामपंचायतीने असे म्हटले आहे की, सदर १२ सर्व्हे नंबर्सच्या जमिनी मलकापूर ग्रामपंचायतीच्या अगदीच हद्दीलगत आहेत. तसेच त्या १२ सर्व्हे नंबर्सची नोंद मलकापूरच्या ८ अ च्या उताऱ्यावर आहे. मलकापूर ग्रामपंचायत निर्माण झाल्यानंतर फाळणीच्यावेळी नजरचुकीने ते सर्व्हे नंबर्स मलकापूर हद्दीत घालायचे राहून गेले. सध्या त्या सर्व्हे नंबर्समधील लोक कराड नगरपरिषद हद्दीमध्ये समाविष्ट व्हायला तयार नाहीत. त्यांना मलकापूर ग्रामपंचायत हद्दीमध्येच रहावयाचे आहे आणि तसे त्यांनी मलकापूर ग्रामपंचायतीस लेखी दिलेले आहे. त्याचबरोबर ते घरफाळा आणि पाणीपट्टी मलकापूर ग्रामपंचायतीकडे भरतात. ग्रामपंचायतीने सर्व नागरी सुविधा तया भागात पुरवलेल्या आहेत.[१०] त्यामुळे ते सर्व्हे नंबर्स मलकापूर ग्रामपंचायतीस अधिक अनुकूल आहेत. त्यामुळे सदर सर्व्हे नंबर्स काढून कराड शहर हद्दवाढीस आमची हरकत नाही. अशी हरकत मलकापूर ग्रामपंचायतीने मांडली आणि कराड नगरपरिषदेची शहर हद्दवाढ पुन्हा खोळंबली.

दरम्यानच्या काळात मलकापूर नगरपंचायतीची घोषणा झाली. त्यावर हरकती/सूचना मागविणेत आल्या. त्यावर कराड नगरपरिषदेने सदर १२ सर्व्हे नंबर्स

वगळून नगरपंचायतची घोषणा करावी अशी हरकत घेतली आणि हा प्रश्न पुन्हा प्रलंबीत पडला.

वरील सर्व घडामोडींचा अभ्यास केल्यास एक गोष्ट जाणवते ती म्हणजे कराड ग्रामीणचा शहरहद्दीत समाविष्ट करण्यासाठी सरळ विरोध कोणी केलेला नाही. पण प्रश्न १२ सर्व्हे नंबर्सचा आहे.

कराड ग्रामीणचा शहरहद्दीत समावेशाच्या विरोधाचे राजकारण अभ्यासताना आणखी एक दुसरा विचार प्रवाह इथे दिसून येतो. तो म्हणजे वेगळी व स्वतंत्र नगरपालिका कराड ग्रामीणचा विकास करणे होय. या त्रिशंकू भागाचा कराड शहरहद्दीत समावेश करण्याचे राजकारण साधारण ४५ वर्षे चालू आहे. अजून त्याचा निकाल लागलेला नाही. त्यामुळे इथे वेगळी पालिका स्थापन्याशिवाय पर्याय नाही. अशी भूमिका काही राजकारणी मांडताना दिसतात. वेगळी स्वयंशासित संस्था स्थापन केल्यास विकास जलद गतीने होईल. जबाबदार लोकप्रतिनिधी परिसराचा विकास पटकन करतील. ग्रामीण विकासासाठी राज्य आणि केंद्र शासनाच्या अनेक योजना आहेत. यशवंत ग्रामसमृद्धी, पुरा योजना, जल स्वराज्य, निर्मल ग्राम, संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान अशा अनेक योजनांमधून या भागाचा अल्पकाळात विकास घडून येईल. अलिकडील काळात पंचायत राज्य व्यवस्थेमुळे केंद्र सरकारचा विकास निधी थेट ग्रामपंचायतीला प्राप्त होतो. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून जलद विकास होऊ शकतो. उदा. मलकापूर ग्रामपंचायत, आकलूज ग्रामपंचायत इ. चांगली उदाहरणे समोर आहेत. त्यामुळे तेथे वेगळे व स्वतंत्र स्वयंशासन निर्माण केल्याशिवाय पर्याय नाही.[११] कराड ग्रामीणचा परिसर मोठा असल्यामुळे कराड नगरपरिषदेस त्या भागाचा विकास करणे शक्य नाही.[१२] असा एक विचारप्रवाह दिसून येतो. माजी जिल्हा परिषद सदस्य जगदिश जगताप विद्यमान सदस्या, सौ. विद्याताई जगताप यांनी या भूमिकेस अनुकूलता दाखवली व तसा ठराव करून प्रस्ताव शासनास पाठविल्याचे सांगितले. हीच भूमिका माजी विरूद्ध पक्ष सदस्य, श्री. भास्करराव शिंदे यांनी मांडली. वरील

सर्व नेते भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे आहेत व सर्व नेते श्री. पृथ्वीराज चव्हाण, केंद्रीय मंत्री यांच्या नेतृत्त्वाखाली कार्य करतात. त्यांची ही भूमिका पक्षाचे धोरण नसेलही कदाचित परंतु या दुसऱ्या विचारधारेस ते अनुकूल आहेत. त्यामुळे अप्रत्यक्षपणे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची भूमिका स्वतंत्र स्वयंशासित संस्था स्थापनेस अनुकूल दिसते व त्यातून राष्ट्रीय काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातील परस्पर विरोधाचे, विरोधासाठी विरोधाचे शह-कटशहाचे शीत राजकारण चालू असलेचे दिसते.

## ३.५ विधानसभा निवडणूकीमध्ये विकासाचे बाबतीत आमदारांची भूमिका -

कराड ग्रामीणचा त्रिशंकू भाग विधानसभेच्या कराड उत्तर विधासभा मतदार संघात येतो. आजपर्यंत अनेक नामवंत व्यक्तींनी विधानसभेत या मतदार संघाचे नेतृत्त्व केलेले आहे. श्री. पी.डी. पाटील, श्री. शामराव आष्टेकर, श्री. बाळासाहेब पाटील इ. सद्या करीड उत्तरचे आमदार श्री. बाळासाहेब पाटील हे आहेत. करीड ग्रामीणमध्ये २००१ च्या जनगणनेनुसार एकूण १५१६३ एवढी लोकसंख्या आहे तर ६८७१ एवढी मतदार संख्या आहे. ही मतदार संख्या तशी पाहिल्यास भरपूर आहे. त्यामुळे या परिसराला विधानसभा निवडणूकीमध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. त्यानुसार सर्वच राजकीय पक्ष आणि नेतेमंडळी या परिसरावर लक्ष ठेऊन असतात.

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक २००४ साली पार पडली. त्यामध्ये अनेक पक्षांचे उमेदवार अपक्ष उमेदवार निवडणूकीत उभे होते. त्यामध्ये मुख्य लढत राष्ट्रवादी काँग्रेस आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आघाडीचे उमेदवार, श्री. बाळासाहेब पाटील व अपक्ष उमेदवार श्री. अरूण जाधव यांच्यात झाली व श्री. बाळासाहेब पाटील विजयी झाले. त्या पूर्वीच्या विधानसभेत देखील श्री. बाळासाहेब पाटीलच विजयी झाले होते. म्हणजे साधारण दोन पंचवार्षिक निवडणूका किंवा दोन वेळा या परिसराचे नेतृत्व श्री. पाटील यांनी केले आहे. या दोन्ही निवडणूकांमध्ये करीड ग्रामीणच्या करीड शहरहद्दीत समावेशासंबंधी त्यांनी आश्वासने दिलेली आहेत. तसेच या परिसराच्या

विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचे स्वीकारले आहे. आमदार स्थानिक विकास निधी म्हणून त्यांनी बरीच रस्त्यांची, गटारांची कामे केलेली आहेत. तसेच अलिकडील काळात या परिसरातील पाण्याची व भुयारी गटार बांधणेची समस्या दूर करण्यासाठी कराड नगरपरिषद व जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून ५० कोटी रूपयांची योजना नगरपालिकेने मंजूर केलेली आहे व त्याचा पाठपुरावा शासनाकडे करीत आहेत.

हा परिसर कराड उत्तर विधानसभा मतदार संघात येतो व या मतदार संघाचे विधानसभेत दुसऱ्यांदा प्रतिनिधीत्त्व श्री. बाळासाहेब पाटील करीत आहेत. त्यामुळे त्या परिसराच्या विकासाला सर्वाधिक जबाबदार आमदारच आहेत असे दिसते. आणि त्या अनुषंगाने कराड ग्रामीण मध्ये अधिकाधिक विकास कामे करण्याचे त्यांचे धोरण दिसून येते. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत अनेक विकास कामे केलेली आहेत. त्यामध्ये रस्ते बांधणी, दुरूस्ती, गटारे बांधणी, रस्त्यांचे खडीकरण, मुरूमीकरण, डांबरीकरण इ. कामांचा समावेश होतो. पोस्टल कॉलनी, त्रिमूर्ती कॉलनी, कार्वे नाका, अरूणोदय कॉलनी, खराडे कॉलनी, रूक्मिणी गार्डन, शिलानगर, वाखाण रस्ता, पार्श्वनाथ नगर, शेटेनगर इ.वसाहतींमध्ये रस्त्यांच्या कामासंदर्भात दिलेली आश्वासने पूर्ण केलेली दिसतात.

हा परिसर पूर्ण विकसित झाला पाहिजे. त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन श्री. पाटील यांनी बऱ्याच वेळा दिलेले आहे. त्याचबरोबर हा भाग कराड नगरपरिषद हद्दीमध्ये घेण्याचे प्रयत्नदेखील चालू असल्याचे सांगितले.

वरील सर्व विवेचन पाहिले असता, कराड ग्रामीण हा भाग कराड नगरपरिषद हद्दीमध्ये समाविष्ट करणे व तोपर्यंत पर्याय म्हणून विविध योजना, प्रकल्प, निधी, स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधींच्या माध्यमातून विकासासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसते.

## ३.६ जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांची भूमिका -

कराड ग्रामीण हा भागपंचायत समितीच्या कार्वे गणात तर जिल्हा परिषदेच्या वडगाव हवेली गटात येतो. जिल्हा परिषदेत मागील निवडणूकीत श्री. जगदीश जगताप हे निवडून आले होते. तर सध्या या गटात सौ. विद्याताई जगदिश जगताप निवडून आल्या आहेत. पंचायत समितीमध्ये मागच्या वेळेस श्री. कैलास जाधव हे प्रतिनिधित्त्व करीत आहेत. जिल्हा परिषदच्या गटात कराड ग्रामीण, कार्वे व वडगाव ही तिन्ही मोठ्या लोकसंख्येची गावे आहेत.

कराड ग्रामीणच्या विकासाच्या बाबतीत सर्व सदस्यांमध्ये मतैक्य दिसते. या परिसराच्या विकासासाठी सर्व प्रयत्न करण्याचे त्यांनी बोलून दाखविले. स्थानिक विकासनिधी, पुरा योजना, ग्रामस्वराज्य, स्वजलधारा, जलस्वराज, ग्राम स्वच्छता अभियान, त्रिशंकू विकास निधी, यशवंत ग्रामसमृद्धी योजना, १२ वा वित्त आयोग अशा विविध योजनांमधून जास्तीतजास्त निधी उभा करून परिसराच्या विकासाचे अभिवचन त्यांनी दिले आहे. परंतु स्वयंशासनाच्या बाबतीत मात्र परस्पर विरूद्ध भूमिका दिसते. सौ. रसाळ यांनी हा परिसर कराड नगरपरिषद हद्दीमध्ये समाविष्ट झाल्याशिवाय विकास होणार नाही व त्यासाठी सर्व तोपरी प्रयत्न करण्याचे सांगितले. तर जिल्हा परिषद सदस्या सौ. विद्याताई जगताप व माजी जिल्हा परिषद सदस्य जगदीश जगताप यांनी कराड ग्रामीणमध्ये स्वतंत्र स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन केल्याशिवाय भागाचा विकास होणार नाही असे स्पष्ट केले व तसा प्रयत्न चालू असल्याचे सांगितले. तसा ठराव करून प्रस्ताव पाठविण्याचे सांगितले. अशा प्रकारे पंचायत समिती सदस्य व जिल्हा परिषद सदस्य यांच्यामध्ये कराड ग्रामीण या विकासाची भूमिका दिसते.

## ३.७ मलकापूर ग्रामपंचायतीची भूमिका -

मलकापूर येथे राहणरे श्री. भास्करराव शिंदे यांनी दोन वेळा विधानपरिषदेचे सदस्यत्व प्राप्त केलेले आहे. १९८२ ते १९९४ अशी बारा वर्षे विधानसभेमार्फत

विधानपरिषदेवर निवडून गेलेले आहेत व १९६६ पासूनते मलकापूर ग्रामपंचायतीच्या स्थापना आणि विकासाच्या कार्यात स्वतःला वाहून घेतलेले आहे. सद्या श्री. मनोहर शिंदे हे त्यांचे चिरंजीव मलकापूर ग्रामपंचायतीचे सरपंच असून दोघांची भूमिका या प्रश्नावर सारखीच दिसते.

सुरूवातीला मलकापूर ग्रामपंचायतीने शहर हद्दवाढी विरूद्ध याचिका दाखल केली होती. कारण त्यावेळी शहर हद्दवाढीत जवळजवळ संपूर्ण मलकापूर गावच समाविष्ट होत होते. त्यामुळे स्वतंत्र अस्तित्त्व नष्ट तर झालेच असते त्याचबरोबर शहरातील विविध कर भरणे ग्रामीण भागातील नागरिकांना शक्य झाले नसते ही भूमिका होती.

दुसऱ्यांदा शहर हद्द वाढीवर हरकत नोंदविताना कराड ग्रामीण मधील १२ सर्व्हे नंबर्स वगळावेत अशी मागणी केलेली होती. सर्व्हे नं. ३९९, ४०६, ४०७, ४०८, ४०९, ४१०, ४१५, ४१६, ४१७, ४२१,४२२, ४२३ हे सर्व्हे नंबर्स वगळून कराड शहर हद्दवाढ करणेस हरकत नसलेची भूमिका मांडली. कारण सदर १२ सर्व्हे नंबर्स हे मलकापूरच्या ८ अच्या उताऱ्यावर आहेत. तेथे राहणारे सर्व नागरिक मलकापूर ग्रामपंचायतीत राहणेस इच्छुक आहेत व तसे त्यांनी लेखी निवेदन दिले आहे. मलकापूर ग्रामपंचायती मार्फत या १२ सर्व्हे नं. परिसरात सर्व नागरी सुविधा पुरविल्या जातात. रस्ते, दिवाबत्ती, पाणी, गटर इ. सेवा पुरवल्या जातात. तसेच हे सर्व नागरिक घरपट्टी व पाणीपट्टी मलकापूर ग्रामपंचायतीत स्वेच्छेने भरत आहेत. त्यामुळे हे १२ सर्व्हे नं. सोडून शहर हद्दवाढीस कोणतीही हरकत नाही. जर हे सर्व्हे नंबर्स वगळून शहर हद्दवाढ होणार असेल तर आम्ही केंव्हाही ना हरकत प्रमाणपत्र देणेस तयार आहोत.[१३] अशा प्रकारची भूमिका मलकापूर ग्रामपंचायत मांडताना दिसते.

## ३.८ १२ सर्व्हे नंबर्स मधील नागरिकांची भूमिका -

कराड शहर हद्दवाढीच्या प्रक्रियेतील सर्व तांत्रिक अडचणी आता दूर झालेल्या आहेत. एकच मुद्दा वादग्रस्त राहिलेला आहे, तो म्हणजे १२ सर्व्हे नंबर्स करिता

मलकापूर ग्रामपंचायत आणि कराड नगरपालिकेमध्ये चाललेली रस्सीखेच होय. हे १२ सर्व्हे नंबर्स पुढीलप्रमाणे- ३९९, ४०६, ४०७, ४०८, ४०९, ४१०, ४१५, ४१६, ४१७, ४२१, ४२२, ४२३ असे हे सर्व्हे नंबर्स आहेत. या सर्व्हे नंबर्स मध्ये राहणारे नागरिक आणि व्यावसायिक यांची भूमिका या प्रकरणात महत्त्वाची ठरते.

उपरोक्त १२ सर्व्हे नंबर्सचा परिसर कराड शहर हद्दीलगतचा आणि मलकापूर ग्रामपंचायत हद्दीलगतचा हा भाग आहे. हा परिसर इतर भागाच्या तुलनेने अतिशय मोक्याच्या आणि मध्यवर्ती ठिकाणी असल्याचे दिसते. कोल्हापूर नाका ते शारदामंगल कार्यालया दरम्यानचा हा अतिशय विकसित परिसर आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र.४ च्या लगत असलेल्या या परिसरामध्ये संगम हॉटेल, सागर हॉटेल, मंगल कार्यालये, बोराटे पेट्रोल पंप, छोटी मोठी दुकाने, हॉटेल्स, पार्लर्स, गॅरेज लाईन, वर्कशॉप, बार, परमीट रूम, सेवा व्यवसाय, फॅब्रिकशेनचे वर्कशॉप, निवासी अपार्टमेंट आणि व्यावसायिक संकुले, ट्रान्सपोर्ट ऑफीस आणि गोडावून्स, बँका, पतसंस्था, बांधकाम व्यावसायिक, दवाखाने, मेडीकल स्टोअर्स, लॅबोरेटरी, स्पेअरपार्टसची दुकाने, सर्व्हिसींग सेंटर्स, लॉजिंग, एस.टी.डी. बूथ असे अनेक प्रकारचे व्यवसाय आणि व्यावासायिक या परिसरामध्ये आहेत. वरील सर्व बाबींचा अभ्यास केल्यास एक गोष्ट जाणवते ती म्हणजे वरील सर्व बाबी या व्यावसायिक आहेत. या सर्व व्यावसायिकांकडून मलकापूरला वार्षिक कर रूपाने चांगले उत्पन्न मिळते. घरपट्टी, पाणीपट्टी इ. माध्यमातून घसघसीत उत्पन्न मिळते. त्यामुळेच हा परिसर दोन्ही स्वराज्य संस्थांच्या आकर्षणाचे कारण ठरला आहे. तसेच या परिसरामध्ये काही उच्चभ्रू व मोठ्या आसामी राहतात. त्यांचे हितसंबंध जोपासणे हा देखील एक हेतू असू शकतो. यातील काही सर्व्हे नंबरमध्ये मोठ्या व्यक्तींचा समावेश हेता. त्यांच्याकडून मोठ्या स्वरूपात कर मिळणे अपेक्षित होते.[१४] या परिसरात असणाऱ्या विविध व्यवसायांमुळे कर रूपाने मिळणारे उत्पन्न हा एक मुद्द आहे. त्यात बरोबर हा परिसर मलकापूर हद्दीत राहिल्यामुळे मलकापूरच्या राजकारणाला एक वेगळे अस्तित्त्व व दर्जा प्राप्त झाला

आहे. तसेच हा परिसर मलकापूर हद्दीत राहिल्यामुळे तेथे राजकारण उभे करता येते. त्या परिसरातील लोकांच्या राजकीय सहभागामुळे आपली राजकीय ताकद वाढेल व राजकारणात त्याचा लाभ उठवतायेईल ही एक भूमिका मलकापूर मधील राजकारणात दिसून येते. हा परिसर कराड शहर हद्दीत गेल्यास कर व निर्बंधांना तोंड द्यावे लागेल. या भितीने मलकापूर हद्दीत राहू इच्छिणाऱ्या नागरिकांच्या इच्छेचा राजकीय लाभ उठविण्यास मलकापूर ग्रामपंचायत कुठेही कमी पडत नाही असे दिसते. सदरचे १२ सर्व्हे नंबर्स कराडच्या ७/१२ वर असले तरी मलकापूरच्या ८ अ च्या उताऱ्यावर पण आहेत. यासदंर्भात विधानपरिषदेचे माजी आमदार भास्करराव शिंदे यांना विचारले असता "ते सर्व सर्व्हे नंबर्स मलकापूर हद्दीतीलच आहेत. मलकापूरच्या स्वतंत्र ग्रामपंचायतीच्या स्थापनेनंतर फाळणीच्या वेळी नजरचुकीने ते नंबर्स मलकापूर ग्रामपंचायत हद्दीमध्ये समाविष्ट करायचे राहून गेले. त्यामुळे ते कराड ग्रामीणमध्ये गेले. त्यांची नोंद मलकापूरच्या ८अ च्या उताऱ्यावर आहे. त्यामुळे तो भाग मलकापूरचाच आहे"[१५] असा त्यांनी निर्वाळा दिला.

सदरचा परिसर मलकापूर हद्दीत राहिला तर ग्रामपंचायतीला आर्थिक उत्पन्न तर चांगले मिळतेच त्याचबरोबर लोकसंख्या वाढदेखील होते व त्या आधाराने मलकापूर ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपंचायतीत किंवा क वर्ग नगरपालिकेत करता येईल व त्या माध्यमातून एक स्वतंत्र राजकीय अस्तित्त्व निर्माण करता येवू शकते व या बळावरच बरीच मोठी राजकीय मजल मारता येईल ही भूमिका मलकापूरच्या राजकारणात मध्यवर्ती दिसून येते.

या १२ सर्व्हे नंबर्स मध्ये राहणारे बहुतांश नागरिक हे मानसिक दृष्ट्या मलकापूर ग्रामपंचायत हद्दीत राहण्याच्या विचारांचे आहेत. हे विविध गोष्टींवरून साध्य करता यते. या परिरातील सर्व जण मलकापूर ग्रामपंचायतीकडून मिळणाऱ्या सर्व नागरी सुविधा स्विकारतात. लाईट, पाणी, रस्ते, गटारे इ. सुविधा स्विकारतात व त्या मोबदल्यात ते आपली घरपट्टी, पाणीपट्टी व इतर कर मलकापूर ग्रामपंचायतीत

भरतात. त्याचबरोबर आम्हाला मलकापूर ग्रामपंचायत हद्दीमध्येच रहावयाचे आहे असे लेखी निवेदन त्यांनी मलकापूर ग्रामपंचायतीस दिलेले आहे व या १२ सर्व्हे नंबर्स सोडून इतर भाग कराड शहर हद्द वाढीत समाविष्ट करण्यास हरकत नाही असे त्यांनी सांगितले. या वरून या नागरिकांचा कल कोणत्या दिशेने आहे हे स्पष्ट होते. तेथील नागरिकांनी ही भूमिका घेण्यामागे दोन कारणे असलेली दिसतात. त्यातील पहिले आर्थिक आहे तर दुसरे राजकीय स्वरूपाचे आहे.

हा परिसर कराड शहर हद्दीत समाविष्ट झाला तर नगरपरिषदेच्या नियमाप्रमाणे घरपट्टी, पाणीपट्टी, विजबिले व इतर तत्सम कर भरावे लागतील हे कर नगरपालिका हद्दीमध्ये जास्त असतात व त्याचा भुर्दंड सोसणार नाही. त्याचबरोबर टाऊन प्लॅनिंगप्रमाणे रस्ते रूंदी होवून बांधलेली घरे, दुकाने पाडावी लागतील. तसेच सोन्याच्या कितीच्या मोकळ्या जागांवर शाळा, उद्याने, शासकीय कार्यालयांकरिता आरक्षण लागू झाल्यास जमिनी फुकट वारी किंवा अत्यंत अल्प मोबदल्यात जातील. टाऊन प्लॅनिंग प्रमाणे बांधकामावर कडक निर्बंध येतील. घर बांधणी करिता एफ.एस.आय. कमी होऊन लहान लहान घरे बांधावी लागतील. घराच्या बांधकामासाठी नगरपरिषद व टी.पी. ऑफीस सातारा यांचेकडे हेलपाटे खावे लागतील. तसेच त्यासाठी पैशाचा देखील अपव्यय होतो हा एक विचार त्या सर्व्हे नंबरमधील लोकांनी केलेला दिसतो.

दुसरा दृष्टिकोन आहे तो राजकारणाचा. कराड शहर हद्दीत गेल्यास कराड नगरपालिकेच्या राजकारणात फक्त १२ सर्व्हे नंबरमधील मर्यादित लोकांना काय स्थान असणार. नगरपालिकेत नव्याने चूल मांडावी लागणार किंवा नगरपरिषदेत आधीपासूनच अस्तित्त्वात असलेल्या नगरविकास आघाडी किंवा जनशक्ती आघाडी किंवा एखाद्या गटात त्यांचेच नेतृत्त्व स्विकारून जगावे लागणार. नगरपालिकेत अस्तित्त्व निर्माण करण्यासाठी लागणारा प्रचंड लोकमताचा पाठिंबा देखील असणार नाही. पर्यायाने आपले राजकीय अस्तित्त्व धोक्यता येऊ शकते. नगरपालिकेचा व्याप

आणि विस्तार अतिशय मोठा असल्याने आपली त्या संबंधीत कामेदेखील जलद गतीने होणर नाहीत व त्याचा फटका आपल्याला बसणार. या उलट मलकापूर ग्रामपंचायत हद्दीमध्ये असल्यास टाऊन प्लॅनिगचा विषयच नाही. बांधकाम परवाने किंवा अन्य कामे ग्रामपंचायती मार्फत पटकन करून घेता येतात. ग्रामपंचायत कार्यालयाचा व्याप लहान असल्यामुळे सर्व परवानग्या, जलद गतीने मिळतात. कामे पटापट होतात व आपले स्वतंत्र एक राजकीय अस्तित्त्व टिकून राहू शकते. मलकापूर ग्रामपंचायतीस भरपूर प्रमाणात कर देत असल्यामुळे एक हुकमी दबाव गट निर्माण करता येतो व त्या माध्यमातून हवी ती कामे सवलती प्राप्त करता येतात. तसेच मर्यादित लोकांचा मजबूत राजकीय गट निर्माण करता येतो व त्या माध्यमातून राजकीय एक जिनसीपणा येऊन राजकारणावर प्रभाव पाडता येतो व त्या माध्यमातून विविध सेवा सवलती मिळविता येतात. असा एक राजकीय दृष्टिकोन या परिसरातील नागरिकांचा दिसतो.

## ३.९ कराड ग्रामीणमध्ये सुविधा पुरविण्यासाठी पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, आमदार, खासदार यांनी केलेले कार्य -

कराड ग्रामीणचा विकास करण्याची भूमिका उपरोक्त सर्वांचीच आहे. किंबहुना कराड ग्रामीणचा विकास होऊ नये असे कोणालाच वाटत नाही. इथून तिथून सर्व जण या भागाचा सर्वांगीण विकास झालाच पाहिजे या विचाराचीच आहेत. परंतु शासनाकडून उपलब्ध होणारा निधी, लोकप्रतिनिधींचा स्थानिक विकास निधी, नगरपालिकेच्या अधिकार मर्यादा या सर्व गोष्टींचा विचार केल्यास कराड ग्रामीणचा सर्वांगीण विकास करण्यासाठी या सर्व बाबी खूपच तुटपूंज्या आहेत. लोकप्रतिनिधींची या भागासाठी विकासाची तळमळ असल्याची दिसते. परंतु त्यांच्याजवळ उपलब्ध असलेला विकास निधी, विविध शासकीय योजनांमधून उपलब्ध होणारी राशी ही निव्वळ कराड ग्रामीणवर खर्च करता येणे शक्य नाही. तो प्रतिनिधी ज्या मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करतो त्या संपूर्ण मतदार संघाच्या विकासाला तो जबाबदार असल्याने उपलब्ध निधी संपूर्ण मतदार संघातील विकास कामावर वितरीत करावा

लागतो. पर्यायाने कराड ग्रामीणच्या वाट्याला अत्यंत तुटपुंजी राशी येते. त्यातून होणारा विकास हा कराड ग्रामीणच्या क्षेत्रफळाच्या तुलनेने अगदीच थोडका आहे. हा विकास एक नवापैसा सुद्धा होत नाही.[१६] एवढ्या मोठ्या व्यस्त प्रमाणात क्षेत्रफळ आणि विकासकाम यातील तफावत दिसते.

कराड ग्रामीणचा विकास करण्याच्या भावनेने अनेक लोकप्रतिनिधींनी प्रयत्न केला. परंतु समस्यांच्या तुलनेत ही विकासकामे अगदीच नगण्य आहेत. जिल्हा परिषद सदस्यांचा स्थानिक विकास निधी, त्रिशंकू भाग निधी, १२ वा वित्त आयोग, यशवंत ग्राम समृद्धी योजना, आमदार स्थानिक विकास कार्यक्रम, खासदार स्थानिक विकास कार्यक्रम इ. मार्गातून निधी उभा करून कराड ग्रामीणच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न झालेले दिसतात. या सर्व विकासकामांच्या माध्यमातून समस्या सोडविण्यासाठी जो प्रयत्न झाला तो खालीलप्रमाणे-

**अ. रस्ते बांधणी आणि दुरूस्तीची समस्या -**

कराड ग्रामीणमध्ये ज्या भीषण समस्या आहेत. त्यातील एक प्रमुख समस्या म्हणजे रस्त्यांची समस्या होय. वास्तविक पाहता रस्ते हे शरीररूपी शहराच्या रक्तवाहिन्या असतात असे म्हणतात. परंतु कराड ग्रामीणमधील या रक्तवाहिन्याच दुरावस्थेत असल्यामुळे संपूर्ण शरीर सडायला लागले आहे. पूर्व नियोजित भव्य आणि दुतर्फा गटर असलेले रस्ते ग्रामीणमधील काही मोजक्या कॉलन्यांमध्येच दिसतात. अन्यथा सर्व ठिकाणी रस्त्यांच्या बाबतीत अंधारच दिसून येतो. काही ठिकाणी रस्ते आहेत परंतू त्यांची अवस्था दयनीय आहे. खाच खळगे एवढे प्रचंड मोठे काही ठिकाणी रस्ते आहेत. परंतू त्यावर फार मोठ्या प्रमाणात झोपडपट्ट्यांचे अतिक्रमण आहे. झोपडपट्ट्यांमधील सर्व दैनंदिन व्यवहार रस्त्यावरच चालतात. त्यामुळे रस्त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. काही ठिकाणचे रस्ते लोकांनी विविध कारणांनी आडवून ठेवले आहेत. तर काही ठिकाणी अधिकृत असे रस्तेच नाहीत. लोक इतरांच्या जमिनीतून, शेतामधून, उकिरड्यावरून, बारा डबऱ्यांवरून, गटारांवरून

मार्गक्रमण करीत आहेत. अधिकृत आणि नियोजित कॉलन्यांचा भाग सोडला तर इथे पूर्वनियोजित रस्ते बनविणारी कोणतीही शासकीय यंत्रणा नसल्यामुळे लोकांनी स्वतःच्या घरासमोरील ५ ते १० फूट जागा सोडून घरे बांधली आहेत व त्यातून उरलेल्या चिंचोळ्या जागेतून आपोआप रस्ते जन्माला आल्याचेच चित्र बहुतांश ठिकाणी दिसते. तरी सुद्धा अशा रस्त्यांच्या व इतर नियोजित रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी झालेली विकास कामे पुढीलप्रमाणे -

**आमदार स्थानिक विकास कार्यक्रम**

**सन २००३ - २००४-**

१. कराड येथील पोस्टल कॉलनी ते सोनाई बोर्ड ते ऑक्सिडेशन पॉइंट रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे. रू. १,९७,८३२/-.

२. कराड येथील त्रिमूर्ती कॉलनीतील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे (३०० मी.) रू. १,४९,०००/-.

३. ता. कराड, अंतर्गत कराड (ग्रामीण) शिक्षक कॉलनी अंतर्गत रस्ते खडीकरण व डांबरीकरण करणे (२५५ मी. ) रू. २,०५,८००/-.

**सन २००४ - २००५ -**

१. कराड ग्रामीणमधील कार्वे नाका येथील अरूणोदय कॉलनीतील रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे (२०० मी. ) रू. २,१६,६७६/-.

२. कराड ग्रामीण येथील माऊली हॉस्पीटल ते खराडे कॉलनी आणि शांतीनगर ते गार्डेकर वस्ती रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे (३६० मी.) रू. १,९९,७००/-.

**सन २००५ - २००६ -**

१. कराड ग्रामीण येथील रूक्मिणी गार्डनमधील शेवटच्या गल्लीमधील खडीकरण व डांबरीकरण करणे, रू. ९८,०००/-.

२. कराड ग्रामीण येथील शिलानगर कलावती माता मंदीर रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे,रू. ९८,४५०/-.

३. कराड ग्रामीण येथील वाखाण रस्ता ते पार्श्वनाथनगर कडे जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण करणे, रू. १,००,१००/-.

४. कराड ग्रामीण येथील शेटेनगर ते शिक्षक कॉलनी रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे, रू. १,७८,९७०/-.

५. कराड ग्रामीण येथील कराड वाखाण रस्ता ते पाटीलनगर कडे जाणारा रस्त्याचे खडीकरण करणे, रू. १,९९,६७०/-.

**खासदार स्थानिक विकास कार्यक्रम**

**सन २००४- २००५ -**

रूक्मिणी गार्डन (कराड ग्रामीण) मधील रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे, (२९० मी.) रू. १,४९,९००/-.

**सन २००५- २००६**

कराड ग्रामीण येथील मुजावर कॉलनी ते कराड नगरपरिषद गांढूळ खत प्रकल्प रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे, रू. १,९८,६४०/-.[१७]

**जिल्हा परिषद सातारा बांधकाम विभागामार्फत झालेली विकास कामे** -

१. रूक्मिणी इस्टेट रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे (२१० मी.).

२. रूक्मिणी नगर रस्ता खडीकरण करणे (३० मी.).

३. पोस्टल कॉलनीतील रस्ता खडीकरण करणे (१६३ मी.).

४. सुमंगल नगर व मुजावर कॉलनीतील रस्ता खडीकरण करणे.

५. सुर्यवंशी मळयातील रस्ता मुरूमीकरण करणे (३०० मी.).

६. वडार वस्ती ते मेरीचे तळे रस्ता डांबरीकरण करणे, रू. २.९४ लक्ष.

७. सूर्यवंशी मळा ते वाखाण रस्ता (बर्गे वस्ती पासून) डांबरीकरण करणे (२२० मी.).

८. कराड वाखाण रस्ता खडीकरण करणे.[१८]

इ. कामे जिल्हा परिषद सातारा बांधकाम विभागामार्फत पार पाडलेली दिसतात.

**ब. गटारे आणि मैला सफाईची समस्या -**

कराड ग्रामीणमध्ये गटर्स आणि मैला सफाईची एक महत्त्वपूर्ण समस्या निर्माण होताना दिसते. या परिसरातील लोकसंख्या आणि वसाहती ज्या वेगाने वाढत आहेत त्या तुलनेत होणारी विकास कामे अगदीच नगण्य आहेत. गटारे आणि मैला सफाईच्या बाबतीत ते प्रकर्षाने जाणवते. कराड ग्रामीणच्या बहुतांश भागात घरातील सांडपाणी वाहून जाण्यासाठी गटारांची सोय नाही. त्यामुळे नागरिकांनी घराच्या पुढील व मागील बाजूस शोषखड्डे काढून त्यामध्ये सांडपाणी आणि मैला जिरवण्याची सोय केलेली आहे. काही भागांमध्ये लोकप्रतिनिधींच्या स्थानिक विकास कार्यक्रमातून गटारे बांधून झाली आहेत. परंतु ही गटारे पूर्ण लांबीची नसून उपलब्ध निधीमध्ये बांधून झाली आहेत व गटारांचा शेवट तेथेच कोठे तरी केल्यामुळे घाण पाण्याची डबकी साचलेली आहेत. जी गटारे बांधलेली आहेत त्यांचा दर्जा अतिशय निकृष्ट असल्याचे दिसते. त्याचबरोबर या गटारांची नियमितपणे सफाई करण्याची कोणतची यंत्रणा नसल्यामुळे गटर नरकाप्रमाणे घाणेरडे बनले आहेत. या गटरांमधून साचलेल्या पाण्यावर डासांचे साम्राज्य उभे आहे व त्याचा गंभीर परिणाम महिला व बालकांवर होताना दिसतो.

मैला सफाईच्या बाबतीत काही वेगळी परिस्थिती नाही. त्रिशंकू भागामध्ये भुयारी गटार योजना अद्यापी करणेत आलेली नाही. सद्या त्रिशंकू भागामध्ये सेप्टीक टँकचा वापर करणेत येत आहे.[१९] कराड शहरात मात्र १९६५ साली भुयारी गटार योजना राबविणेत आली व त्यानुसार खाजगी व सार्वजनिक शौचालये भुयारी गटर योजनेस जोडण्यात आले. त्यामुळे कराड शहरात मात्र ही समस्या नाही. परंतु कराड ग्रामीण मध्ये मात्र या समस्येंने रूद्र रूप धारण केले आहे. नळपाणी पुरवठा

योजनेप्रमाणे त्रिशंकू भागासह कराड शहराच्या सुधारीत भुयारे गटार योजनेचे अंदाजपत्रक करणेचे काम हाती घेणेत आलेले आहे.[२०]

कराड ग्रामीणमध्ये झालेली गटर बांधणी व शौचालयाची कामे पुढील प्रमाणे. सदर कामे जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत झालेली आहेत.

१. रेठरेकर कॉलनीतील गटर बांधणे - २४० मीटर.

२. तलाठी कॉलनी, रेव्हेन्यू कॉलनी गटर बांधणे - रू. ४०,९००/-.

३. मुजावर कॉलनी, पोस्टल कॉलनी, विठ्ठलनगर, बारा डबरे मधील अंतर्गत गटर - पाण्याच्या टाकीपासून पोस्टल कॉलनीपर्यंत गटर बांधणे - रू. ६ लक्ष.[२१]

**खासदार स्थानिक विकास कार्यक्रम**

**सन २००४ - २००५ -**

कराड ग्रामीण डोंबारी वाडा- कार्वे नाका येथे स्वच्छता गृह बांधणे- रू. २,००,०००/-.

वरीलप्रमाणे गटर आणि शौचालयाची विकास कामे झालेली दिसतात. अलिकडील काळात कराड नगरपालिकेने काही भागात भुयारी गटार योजनेची सुरूवात केलेली आहे.

कराड ग्रामीणमध्ये भुयारी गटार योजनेचे काम हाती घेणे ही मोठी समस्या आहे. कारण येथील अनियंत्रितपणे वाढलेल्या वस्त्या अरूंद आणि चिंचोळे रस्ते, काही ठिकाणी रस्त्यांचाच अभाव आणि मग कराड ग्रामीणचे मोठे विस्तार क्षेत्र या सर्व गोष्टींचा विचार केल्यास या ठिकाणी भुयारी गटार योजना कार्यान्वित करणे हे एक मोठे आव्हान आहे. तरी सुद्धा नगरपालिकेने अलिकडील काळात रूक्मिणीनगर नजीक दुरदर्शन केंद्र जवळील ड्रेनेजच्या पंपीग स्टेशनचे आसपास थोड्याफार प्रमाणात, कार्वे नाका सुभाष जोशींचे घर तसेच बनपूरीकर कॉलनी मधील एखादी लाईन एवढी भुयारी गटार पीस वर्क करून पूर्ण केलेली दिसते. परंतु कराड ग्रामीण

मधील बहुतांश परिसरात मात्र भुयारी गटार योजना अस्तित्वात नाही. कराड ग्रामीणमध्ये भुयारी गटार योजनेच्या प्रथम टप्प्यांचे काम जीवन प्राधिकरण करीत आहे.

**क. दिवाबत्ती आणि रस्ते सफाईची समस्या -**

रस्त्यावरील आणि सार्वजनिक ठिकाणांवरील दिवाबत्ती ही नागरी जीवनातील एक महत्त्वपूर्ण गरज बनलेली आहे. कराड ग्रामीणचा विस्तार झपाट्याने होत आहे. नवनवीन वस्त्या, वसाहती, लहान नगरे, कॉलन्या यांची निर्मिती गतिमान झालेली आहे. अशा परिस्थितीत या परिसरामध्ये रस्त्यांवर स्ट्रीट लाईट असणे ही नागरिकांची मागणी निश्चितच व्यवहार्य आहे. रोजगार, नोकरी, व्यवसाय, शिक्षण अशा विविध कारणांसाठी दररोज लोकानां पहाटेपासून रात्रीपर्यंत ये जा करावी लागते. त्यामध्ये तरूणांबरोबरच वृद्ध, महिला, लहान विद्यार्थी इ. चा समावेश होतो. परंतु रस्त्यावरील स्ट्रीटलाईट अभावी नागरिकांचे अंधारात बाहेर पडणे अवघड झाले आहे. भल्या पहाटे नोकरीसाठी बाहेर पडणारा एक वर्ग आहे. त्याचबरोबर खाजगी शिकवणी वर्गाला जाणारे विद्यार्थी येथे आहेत. त्यांचे दिवाबत्ती अभावी प्रचंड हाल होताना दिसते. रात्री काळाकुट्ट अंधार असल्यामुळे चोऱ्यांचे देखील प्रमाण वाढले आहे.

कोणत्याही ठिकाणच्या दिवाबत्तीची व्यवस्था अभ्यासली असता एक गोष्ट जाणवते ती म्हणजे कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था तेथील नागरिकांच्या कडून विविध स्वरूपाचे कर वसूल करत असते. पाणीपट्टी, घरफाळा, करमणूक कर, जकात, जमीन व इमारत कर, जाहिरात कर, वाहन कर, यात्रा कर, स्वच्छता कर, जलनिसारण कर, शिक्षण कर, कोंडवाडे कर व इतर कर अशा विविध स्वरूपाचे कर तसेच विविध शासकीय योजना, अनुदाने या माध्यमातून तेथील स्थानिक स्वराज्य संस्थेला घसघशीत उत्पन्न मिळते व त्यातून त्या ठिकाणी दिवाबत्तीची सोय केली जाते. रस्ते, गल्ल्या, बोळ, सार्वजनिक ठिकाणी बागा, उद्याने, चौक इ. ठिकाणी दिसून येणारी विजेची सोय वरील सर्व उत्पन्नाच्या माध्यमातून पूर्ण केली जाते. हेच

स्वयंशासनाचे धोरण असते. परंतु कराड ग्रामीणमध्ये कोणतेही स्वयंशासन नाही. लोक कोणताही कर देत नाहीत अशा परिस्थितीत दिवाबत्तीची सोय कोण करणार व कशी करणार हे प्रश्न अनुत्तरीत राहतात. त्याचप्रमाणे इतर सोईंप्रमाणे दिवाबत्ती एकदा बसवली म्हणजे झाले असे नाही तर त्याचे मासिक वीजबील भरायचे कोणी हा एक गंभीर प्रश्न असलेने कराड ग्रामीण हा भाग जसा अधांतरी आहे. तसा अंधारात सुद्धा आहे. अपवादात्मक म्हणून वाखाणकडे जाणाऱ्या रस्त्यावर रूक्मिणी नगर परिसरात काही ठिकाणी नगरपालिकेने स्ट्रीट लाईट उपलब्ध केलेली दिसते. तसेच मुजावर कॉलनी, शदरनगर, खराडे कॉलनी परिसरात लोकवर्गणी व जिल्हा परिषद सदस्य जगदीश जगताप यांचे स्थानिक विकास निधीतून अल्प प्रमाणात दिवाबत्ती केलेली दिसते.

रस्ते सफाईच्या बाबतीत देखील काही निराळी स्थिती नाही. या ठिकाणी कोणतेही स्वयंशासन उपलब्ध नसलेने रस्ते सफाई करायची कोणी व त्याचा खर्च भागवायचा कोणी हा एक यक्ष प्रश्न इथे उभा आहे. त्यामुळे रस्ते सफाई अभावी कराड ग्रामीणमध्ये सर्व ठिकाणी रस्त्यांवर, सार्वजनिक ठिकाणी, गटारांमध्ये कचऱ्याचे मोठमोठे ढिगारे दिसून येतात. येथील नागरिक आपले घर व दारासमोरील स्वच्छता स्वतःच करताना दिसतात. काही ठिकाणी नगरपालिकेच्या अगदीच हद्दीलगत असलेल्या भागतील रस्ते नगरपालिका सफाई करते. तसेच काही सार्वजनिक कार्यक्रमाच्या ठिकाणची साफसफाई नगरपालिका करते. या व्यतिरिक्त रस्ते सफाईची कोणतीही यंत्रणा याठिकाणी नसलेने रस्ते सफाईची एक समस्या इथे दिसते.

### ड. पाणी पुरवठ्याची समस्या -

कराड ग्रामीणमध्ये पेयजल उपलब्धतेची समस्या इतर समस्यांच्या तुलनेने म्हणावी तेवढी गंभीर किंवा भीषण नाही. या परिसरात कराड नगरपालिकेकडून काही प्रमाणात, खाजगी विहीरींमधून तसेच बोअरवेल्सच्या माध्यमातून नागरिकांना पाण्याची

उपलब्धता होताना दिसते. ते पाणी पुरेशा प्रमाणात नसले तरी ही समस्या सोडविण्यासाठी सरकारी यंत्रणेशिवाय इतर पर्याय उपलब्ध असल्याने ही समस्या एवढ्या प्रकर्षाने जाणवत नाही. परंतु पेयजलाची समस्या मिटलेली नाही.

कराड नगरपालिकेमार्फत जी नळपाणी योजना अस्तित्वात आहे तिची क्षमता कमी पडते. कराड शहरासाठी सन १९९०-९२ चे दरम्यान सन २०१५ सालाचे प्रकल्पित टप्पा गृहीत धरून पाणी पुरवठा योजना राबविणेत आलेली होती. मात्र कराड शहरालगताचा झपाट्याने होत असलेला विकास विचारात घेतल्यास सध्याच्या पाणी पुरवठयाच्या सोयी अपुऱ्या पडतात.[२२] त्यामुळे अधिक क्षमतेच्या नवीन नळपाणी पुरवठा योजनेची नितांत आवश्यकता आहे. १९९०-९२ चे दरम्यान नगरपालिकेने जी नळपाणी पुरवठा योजना राबविली त्याची क्षमता पुढीलप्रमाणे -

**भाग- १**

| | | |
|---|---|---|
| १. | जॅकवेल/ पंपघर | - कोयना नदीवरील ६.६० मि.व्यास इंटेकवेलसह |
| २. | जलशुध्दीकरण केंद्र | - १८ दशलक्ष लिटर |
| ३. | उंच टाकी | - १. मार्केट यार्ड - २० लक्ष लिटर<br>२. टाऊन हॉल - १५ लक्ष लिटर<br>३. रविवार पेठ - १५ लक्ष लिटर<br>४. सोमवार पेठ- ६.८० लक्ष (जुनी) |

**भाग - २**

१. सैदापूर हद्दीतील विद्यानगर येथील विविध शैक्षणिक संकुलांना कराड नगरपरिषदेमार्फत पाणी पुरवठा केला जातो.[२३]

वरीलप्रमाणे पाणी पुरवठ्याची साधने उपलबध असून त्याद्वारे कराडवासीयांना व त्रिशंकू भागातील काही नागरीकांना कमी/अधिक प्रमाणात पाणी पुरवठा केला जातो.[२४]

वरीलप्रमाणे कराड नगरपालिकेकडे पाणी पुरवठ्याची क्षमता उपलब्ध आहे. परंतु वरील साधने व व्यवस्था अपुरी पडत असल्यामुळे तसेच त्रिशंकू भागाची झपाटयाने वाढ होत असल्याने वरील क्षमतेची व्यवस्था अपुरी पडत आहे. परिणामी कमी किंवा अत्यल्प प्रमाणात व कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे.

या सर्व समस्येवर मात करण्यासाठी कराड नगरपालिकेने कराड शहर व त्रिशंकू भागासाठी नवीन व सुधारित नळपाणी पुरवठा योजना हाती घेतलेली आहे.

केंद्र शासनाच्या लहान व मध्यम शहरासाठी पायाभूत सुविधांचा विकास करणे या प्रकल्पांतर्गत कराड नगर परिषदेने कराड शहरासाठी व नव्याने समाविष्ट होवू घातलेल्या त्रिशंकू भागासह सुधारित पाणी पुरवठा योजना राबविणेचा प्रकल्प हाती घेतला आहे. याकरिता २०४० सालची लोकसंख्या गृहीत धरलेली आहे. या योजनेकरिता लागणारा खर्च ३९,६५,९७,८००/- इतका अपेक्षित आहे. या योजनेचे संपूर्ण सर्व्हेक्षण आराखडा व खर्चाचा अहवाल तयार करणेचे कार्य महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, उपविभागीय अभियंता, उपविभाग क्र.१, कराड यांनी केलेले आहे.

नवीन प्रस्ताविक योजनेचा आराखडा खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | कराड शहराची लोकसंख्या २०४० | - | ७६,८५३ |
| ब. | शहरालगतचा त्रिशंकू भाग २०४० | - | ६३,६३४ |
| क. | विद्यानगर येथील शैक्षणिक संकुले २०४० | - | ८,००० |
| ङ | या व्यतिरिक्त तरंगती लोकसंख्या २०४० | - | त्या त्या प्रमाणात |
| | एकूण लोकसंख्या - २०४० | - | १,४८,४८७ |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | पाणी पुरवठयाचा दर | - | १३५ लि./माणसी/ दिवशी |
| ३. | एकूण पाण्याची गरज निव्वळ २०४० | - | २२.५७ द.लक्ष लिटर |
| ४. | एकूण पाण्याची गरज तूटसह २०४० | - | २६.६० द.लक्ष लिटर |

**योजनेचा उद्‌भव -**

कोयना नदीवरील सध्याचे उद्‌भवनाचे अंदाजे १,५०० मि. वरील बाजूस वारूंजी के.टी. वेअरचे वरील बाजूस जुन्या वारूंजी हद्दीत प्रस्तावित आहे. हा उद्‌भव भविष्यात दूषित होण्याची शक्यता अत्यल्प आहे.

**योजनेची रचना -**

१. इनटेक विहीर - ४ मि. व्यास

२. कनेक्टींग पाईप - ९०० मि.मि.सी.आय. लांबी ४० मि.

३. इन्स्पेक्शन विहीर - ३.० मि. व्यास

४. जॅकवेल पंपघर - ८ मि. व्यास

५. जोड पूल - ४ मि. रूंद, ३० मि. लांब

६. जलशुद्धीकरण जुने १८ दशलक्ष वापरणे गृहीत धरून नवीन २२ दशलक्ष बांधणे

**प्रस्तावित -**

या योजनेत फक्त एकाच ठिकाणच्या पंपाद्वारे पाणी मार्केट येथील सुमंगलनगर येथील प्रस्तावित २० लक्ष लिटर्सची संतुलीत टाकीत साठवून ते कराडशहरातील सर्व जुन्या/ नव्याने प्रस्तावित उंच टाक्यांमध्ये गुरूत्वाने पोहोचविणेचे प्रस्तावित आहे. यामुळे वीज बिलात बचत होणार आहे.

**उंच टाक्या -**

| अ. नं. | ठिकाण | क्षमता | भाग |
|---|---|---|---|
| १. | मार्केट यार्ड सुमंगलनगर (नवीन) | ४,००,००० (२० लक्ष मधील) | गोळेश्वर रोड, कार्वे नाका |
| २. | मार्केट यार्ड जुनी टाकी | २०,००,००० | वॉर्ड नं. २४,२५,२६ मोहिते हॉस्पीटल, हुतात्मा स्मारक, बैल बझार |

| अ. नं. | ठिकाण | क्षमता | भाग |
|---|---|---|---|
| ३. | टाऊन हॉल जुनी टाकी | १५,००,००० | वॉर्ड नं. १६, १७, १८, २१, २२, २३ |
| ४. | सुर्यवंशी नळा (नवीन) | १५,००,००० | सुर्यवंशी मळा, बर्गे वस्ती, दौलत कॉलनी, मुजावर कॉलनी, शिक्षक कॉलनी |
| ५. | रविवार पेठ जुनी | १५,००,००० | वॉर्ड नं. ५,१३,१४,१५,१९,२० |
| ६. | रूक्मिणीनगर | २०,००,००० | वॉर्ड नं. ३,४ रूक्मिणीनगर, वाखाण रस्ता, प्रकाश अपार्टमेंट, प्रकाशनगर, पवार वस्ती |
| ७. | सोमवार पेठ जुनी | ६,८०,००० | वॉर्ड क्र. १,२,६,७ |
| ८. | सोमवार पेठ नवीन | ४,५०,००० | ८, ९ |
| ९. | पंताचा कोट | ६,००,००० | वॉर्ड नं. १०,११,१२ |

जुन्या योजनेतील जलशुद्धीकरण केंद्र, उंच टाक्या व उपयोगात येणारी वितरण व्यवस्था नवीन योजनेत वापरणेचे प्रस्तावित आहे.[२५]

वरील योजनेचा आराखडा व खर्चाचे अंदाजपत्रक तयार करून सरकार दरबारी योजना सादर करणेत आलेली आहे. वरील सुधारित योजनेत कराड ग्रामीणचा बहुतांश भाग समाविष्ट केलेला आहे. त्यामुळे भविष्यकाळात कराड ग्रामीणमध्ये पेयजल पुरवठ्याची समस्या असणार नाही.

कराड नगरपरिषदेने दि. २४/२/२००५ रोजी विशेष सभेत ठराव क्र. ७/११६ मान्य केला व त्यानुसार दि.१/४/२००५ पासून पाणी पट्टी कराचे दर वाढविले. त्यानुसार कराड ग्रामीणमधील घरगुती वापराच्या $^{१}/_{२}$ इंची कनेक्शनला रू. २,२२०/- एवढी वार्षिक पाणीपट्टी निश्चित केली व बिगर घरगुती वार्षिक दर रू. ११,१००/- एवढा करणेत आला.[२६] परंतु याच प्रकारच्या कनेक्शनकरिता कराड शहर हद्दीत मात्र अनुक्रमे रू. ९६०/- व रू. ४,८००/- एवढा दर आकारणेत येतो. वरील पाणीपट्टी

कर आकारणी कराड शहराच्या तुलनेने ग्रामीणमधील जनतेला साधारण २.५ पट जास्त आहे. सदर पाणीपट्टी जनतेला न पेलणारी व असहय्य आहे. त्यामुळे पाण्याची उपलब्धता कमी प्रमाणात व कमी दाबाने होत असतानासुद्धा नगरपालिकेची पाणीपट्टी म्हणजे 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' किंवा इष्टापत्री म्हणावी लागेल. ही एक विचित्र समस्या कराड ग्रामीण मधील नागरिकांसमोर उभी आहे.

**इ. स्थानिक स्वराज्य संस्थेचा अभाव -**

कराड ग्रामीणचा भाग हा पूर्णपणे त्रिशंकू अवस्थेत आहे. तो कोणत्याही ग्रामपंचायत किंवा नगरपालिका हद्दीत नाही. त्यामुळे तो भाग पूर्णपणे अधांतरीत असून तेथे कोणतेही स्वयंशासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्था नाही. त्यामुळे तेथील विकासाला व नियंत्रणाला कोणतीही अधिकृत संस्था जबाबदार नसलेने त्या भागाचा विकास पूर्णपणे खंडीत होऊन नागरिकांना हालाखीचे जीवन जगावे लागत आहे.

कराड ग्रामीणचा भाग जरी अधांतरी किंवा त्रिशंकू अवस्थेत असला तरी तेथे स्वयंशासन निर्माण व्हावे. तसेच तो भाग कराड हद्दीमध्ये समाविष्ट व्हावा व तेथे विकासाला जबाबदार यंत्रणा निर्माण व्हावी यासाठी कराड नगरपरिषद, पंचायत समिती, कराड तसेच विविध लोकप्रतिनिधींनी प्रयत्न केलेले आहेत व अजून त्यादृष्टीने प्रयत्न चालू आहेत.

कराड नगरपरिषद १९६१ सालापासून हद्दीवाढीसाठी प्रयत्नशील आहे. तसा एकत्रित प्रस्ताव नगरपरिषदेने सादर केलेला होता. त्यानुसार ५/३/१९७६ रोजी शहर हद्दवाढीची उद्घोषणा झाली. त्यानंतर १९८७ साली पुन्हा दुसऱ्यांदा तीच उद्घोषणा नव्याने प्रसिद्ध केली गेली. त्यावर हरकती/सूचनांचा विचार होऊन पुन्हा २०/६/८९ रोजी नगरपरिषदेच्या हद्दवाढीची अंतिम अधिसूचना निर्गमीत करण्यात येऊन हद्दवाढीच्या अंमलबजावणीची दि. २१ जुलै १९८९ प्रसिद्ध करण्यात आली.

तथापि या उद्घोषणा काही लोकांनी हरकत घेऊन उच्च न्यायालयात चार स्वतंत्र याचिका दाखल करून ४/४/१९९० रोजी शहर हद्दवाढीच्या अधिसूचनेस स्थगीती मिळविली. परंतू शासनास पुन्हा संबंधीत हरकती/ सूचना धारकांना सुनावणी देऊन पुढील निर्णय घेण्याची संधीही दिलेली होती. त्याप्रमाणे त्यावेळचे नगरविकास खात्याचे राज्यमंत्री मा. ना. अरूण गुजराथी यांनी सर्किट हाऊस, पुणे येथे सर्वांना सुनावणी दिली. सुनावनीचा निकालही पारीत केला. तथापि मध्येच 'मलकापूर' 'क' वर्ग नगरपरिषद स्थापनेचा प्रस्ताव सादर केला आणि कराड नगरपरिषदेच्या हद्दवाढीचा बोजवारा वाजला अखेरीस कराड नगरपरिषदेच्या हद्दवाढीची अधिसूचना आणि मलकापूर ग्रामपंचायत स्थापनेचा प्रस्ताव शासनाने एका अधिसूचनेद्वारे रद्द केला.

अशा या प्रदिर्घ प्रयत्नानंतर नगरपरिषदेने हद्दवाढीचा नाद सोडला आणि कराड ग्रामीण या त्रिशंकू भागापुरता मर्यादित हद्दवाढीचा प्रस्ताव नव्याने शासनास सादर केला. त्यामुळे या हद्दवाढीची घोषणा दि. ६ सप्टेंबर, २००१ रोजी प्रसिद्ध करण्यात येऊन हरकती/सूचना मागविणेत आल्या. त्यास अनुसरून मलकापूर या गावाने हरकती उपस्थित केल्या व कराड ग्रामीणमधील १२ सर्व्हे नंबर्स हद्दवाढीतून वगळावेत असे लेखी दिले. त्याची सुनावनी झाली. परंतु अद्याप कार्यवाही प्रलंबीत आहे.[२७]

अशा पद्धतीने कराड नगरपरिषदेने आणि त्या काळातील नेतृत्त्वाने कराड ग्रामीण हा स्वयंशासन देण्याच्या उद्देशाने कराड नगरपरिषद हद्दीत समाविष्ट करणेचा प्रयत्न केलेला दिसतो.

कराड नगरपरिषदेप्रमाणेच कराडच्या पंचायत समितीनेदेखील येथे स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण व्हावी यासाठी बरेच प्रयत्न केलेले आहेत.

कराड पंचायत समितीच्या २५ जुलै, १९९६ च्या मासिक सभेत तत्कालिन सदस्यांनी कराड ग्रामीणचा भाग अद्यापी नागरी सुविधांपासून वंचित आहे. या विभागातील नेहरूनगर, कार्वेनाका पश्चिम भाग व पूर्व भाग, पश्चिम बाजूस त्रिमूर्ती

कॉलनी, किर्लोस्कर कॉलनी, उदय कॉलनी, प्रियदर्शनी कॉलनी, बाराडबरी वसाहत, सुयराळनगर, बनपूरीकर कॉलनी अशा नऊ विभागांना स्वतंत्र महसूली गावांचा दर्जा मिळावा तसेच महसुली गावे झाल्यानंतर या विभागातील लोकांच्या विकासासाठी महिला बालकल्याण योजनेअंतर्गत लाभ देणे, विद्यार्थ्यांसाठी सायकली पुरविणे, त्यांना निवासस्थाने उपलब्ध करून देणे, दूरध्वनी सेवा देणे, आदींसह विविध योजनांचा ठराव पंचायत समितीच्या मासिक सभेत करण्यात आला. त्यानंतर २५ जून १९९७ रोजी पुन्हा हाच ठराव सुधारित स्वरूपात पंचायत समितीच्या मासिक सभेत मांडून त्याला मंजूरीही घेण्यात आली. मात्र तत्कालिन जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यांनी ठराव मांडून त्यात राजकारण करण्यापलिकडे काहीही केले नाही. कराड नगरपालिकेच्या हद्दवाढीचा प्रस्ताव हे दोन्हीही प्रस्ताव तेथील नागरिकांना सद्यातरी मृगजळ वाटत आहेत.[२८]

वरील प्रमाणे कराड पंचायत समितीने देखील या परिसराला हक्काचे आणि जबाबदार स्वयंशासन निर्माण व्हावे व त्यातून खोळंबलेला विकास मार्गी लागून लोकांचे जीवन सुसह्य व्हावे असा प्रयत्न केलेला दिसतो.

दरम्यानच्या कालावधीत कराड नगरपरिषद हद्दवाढीस दिवसेंदिवस होणारा विलंब हा येथील जनतेच्या सहनशीलतेचा अंत पाहणारा ठरत असल्याने माजी जिल्हा परिषद सदस्य श्री. जगदीश जगताप, यांचे नेतृत्त्वाखाली कराड ग्रामीण मधील नागरिकांनी आम्हाला स्वतंत्र ग्रामपंचायत मिळावी असा ठराव करून सरकारकडे प्रस्ताव पाठविला आहे.[२९]

अशा विविध संस्था, व्यक्तींच्या माध्यमातून कराड ग्रामीण या त्रिशंकू भागाकरिता हक्काचे स्वयंशासन देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसते.

## फ. झोपडपट्टी व झोपडपट्टी निर्मूलन -

कराड ग्रामीणमधील जे एकूण प्रश्न आहेत त्या सर्व समस्यांच्या सोडवणूकीसाठी त्या त्या काळात वेगवेगळे प्रयत्न झालेले दिसतात. व त्या प्रयत्नांना कमी अधिक प्रमाणात यश देखील आलेले दिसते. परंतु झोपडपट्टी आणि त्यांचे निर्मूलन याविषयी मात्र एकादा अपवाद वगळता अजिबात प्रयत्न झालेले नाही. परिणामतः कराड ग्रामीणमधील झोपडपट्ट्या अधिकाधिक गलिच्छ बनत आपले. हाथपाय इतरत्र पसरवू लागल्या आहेत व दिवसेंदिवस ते रूद्ररूप धारण करीत आहेत. झोपडपट्ट्या आणि गलिच्छ वस्त्या ह्या किती भयंकर मोठी समस्या असते या विषयी आपण दुसऱ्या प्रकरणात विविध समाजशास्त्रज्ञांच्या व्याख्यांवरून अभ्यासलेले आहे. कराड ग्रामीणमधील झोपडपट्ट्यादेखील त्यास अपवाद नाहीत.

कराड ग्रामीणमध्ये रूक्मिणीनगरच्या उत्तरेस, शिवाजी स्टेडियमच्या दक्षिणेस असलेली ईदगाह कब्रस्थान ट्रस्टच्या जागेतील विस्तीर्ण झोपडपट्टी, मुजावर कॉलनीच्या शेजारील प्रेमनगर वेश्यावस्तीचा परिसर, पोलीस लाईनच्या मागील बाजूची दरवेशी वसाहत नावाची झोपडपट्टी, मार्केट यार्डच्या पूर्वेस मागील भिंतीस लागून कार्वेनाका पाण्याच्या टाकीपासून कब्रस्थान पर्यंतच्या साधारण अर्धा किलोमीटर लांबीची विस्तीर्ण झोपडपट्टी अशा खाजगी आणि सरकारी जागांवर, रस्त्यांवर अनधिकृत पणे ओंबळवाण्या आणि गलिच्छ वस्त्या उभारलेल्या दिसतात. या झोपडपट्ट्यांमध्ये कोणत्याही प्रकारच्या नागरी सुविधा नसल्यामुळे येथे रोगराई, प्रदूषण, डबकी इ. समस्या दिसून येतात. तसेच मोकाट गाई, जनावरे, कुत्री, डूकरे यांचे साम्राज्य निर्माण झालेले दिसते.

झोपडपट्ट्यांचा प्रश्न एवढा जटिल बनला आहे आणि त्याचबरोबर त्यांचे पुनर्वसन किंवा निर्मुलन करणारी कोणतीही संस्था, योजना अस्तित्त्वात नसल्याने

झोपडपट्टयांचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. झोपडपट्टयांचे निर्मुलन किंवा पुनर्वसन करायचे कोणी आणि कोठे हाच एक संशोधनाचा विषय बनला आहे.

**च. शालेय शिक्षणाची समस्या -**

कराड ग्रामीणमधील शिक्षणाची समस्या हे एक न सुटलेले कोडे आहे. कराड ग्रामीण हा भाग कराड शहरालगत असला तरी तेथील लोकसंख्या, विद्यार्थी संख्या यांच्या तुलनेने शैक्षणिक सुविधांची मात्र आभाळ झालेली दिसते. त्यामुळे घटनेच्या ४ थ्या भागातील कलम नं. ४ नुसार १४ वर्षाखालील मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण हे तत्त्व कोठेही अंमलात येताना दिसत नाही. कराड ग्रामीणमध्ये शिक्षणाच्या केवळ जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा व एखादी खाजगी बालवाडी सोडल्यास शालेय शिक्षणाच्या कोणत्याही सुविधा नाहीत. पुरेशा प्राथमिक शाळा, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालये, कला, वाणिज्य, शास्त्र इ. विद्याशाखा, महिला महाविद्यालय, नाईट कॉलेज, आय.टी.आय., वैद्यकिय महाविद्यालये, लॉ कॉलेज, मॅनेजमेंट कॉलेज, संगणक व तांत्रिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था यातील कोणत्याही प्रकारचे ज्ञान देणारी शैक्षणिक सोय या परिसरात उपलब्ध नाही. शरदनगर मध्ये असलेली जिल्हा परिषद शाळा, बापूजी साळुंखेनगर मधील शाळा व मार्केट यार्डच्या आत असलेले एक हायस्कूल, शरदनगर जिल्हा परिषद शाळेच्या नियंत्रणाखालील महात्मा फुले शिक्षण हमी योजनेचे सहा केंद्रे, नऊ आंगणवाड्या असा हा कराड ग्रामीण मधील शैक्षणिक प्रपंच व त्या शाळांमधून दिसणारी भरमसाठ विद्यार्थी संख्या असे चित्र दिसते.

कोणत्याही खाजगी संस्था या परिसरात शाळा, महाविद्यालये काढायला तयार नसल्याचे दिसते. परिणामी विद्यार्थ्यांना कराड शहरातील शाळांकडे प्रवेशासाठी मोर्चा वळवावा लागतो. त्या शाळा, महाविद्यालयांच्या सांगतील त्या सर्व अटींची पूर्तता करून शाळा प्रवेश घ्यावा लागतो व दररोज शाळेत जाण्यासाठी पायपीठ करावी लागते. प्रवासी वाहतूक व विद्यार्थी वाहतुकीची कोणतीही अधिकृत सोय नसल्याने खाजगी अनधिकृत वाहनांमधून विद्यार्थी वाहतूक सर्रासपणे चालू आहे. सिनिअर

कॉलेजला प्रवेश म्हणजे विद्यार्थ्यांना दिव्य करावे लागते. मलकापूर किंवा सैदापूर परिसरातील महाविद्यालयात जाणेसाठी प्रथम एस.टी. स्टँडपर्यंत पायपीट व नंतर बस प्रवास अशी कसरत करावी लागते.

शरदनगर जिल्हा परिषद शाळेची अवस्था विद्यार्थी संख्येमुळे विचित्र बनलेली होती. प्रचंड विद्यार्थी संख्येमुळे शाळा दोन शिफ्टमध्ये चालवावी लागते. अलिकडील काळात शैक्षणिक वर्ष २००६-२००७ मध्ये जिल्हा परिषद सदस्य, जगदीश जगताप, केंद्रियमंत्री, पृथ्वीराज चव्हाण यांच्या प्रयत्नाने सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत शाळेची जुनी इमारत पाडून नवीन दुमजली सुसज्ज इमारत बांधलेली आहे.[३०]

शहरालगत असलेल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा प्रवेशाचा कल शहरातील खाजगी शाळांकडे असतो. त्यामुळे ग्रामीण भागातील शाळेतील विद्यार्थी संख्या कमी होते. त्यामुळे शासनाकडून शहरालगतच्या ग्रामतीण भागातील शाळांचा कायापालट करून क्रिडांगणे, संगणक, ग्रंथालय अशा सुसज्ज शाळा निर्माण करण्याच्या दृष्टीने 'पुरा' योजना आखलेली आहे. त्या योजनेअंतर्गत शरदनगर येथील जिल्हा परिषद शाळेची निवड झालेली होती. त्याकरिता मोठी जागा आवश्यक होती. पण शरदनगर शाळेची जागा अतिशय मर्यादित असल्याने जवळच कराड नगरपालिकेच्या मालकीची प्रेमनगर व गांढुळ खत प्रकल्पाच्या दरम्यानची जागेची मागणी केली. परंतु नगरपालिकेने ती जागा शाळे न दिल्यामुळे 'पुरा' योजनेअंतर्गत भव्य आणि सुसज्ज शाळेचे स्वप्न साकार होवू शकले नाही.[३१]

खाजगी शाळा महाविद्यालयेदेखील या परिसरात नाहीत. अलिकडील काळात सरकारने शाळांची अनुदाने बंद केल्यामुळे विनाअनुदानित शाळा, महाविद्यालये काढणे व चालविणे केवळ अशक्य बनल्याने या परिसरातील शैक्षणिक सुविधेचे चित्र दिवसेंदिवस धूसर बनत चालले आहे.

**छ. ट्रान्स्पोर्ट, बसेस, रिक्षा इ. समस्या -**

कराड ग्रामीणच्या परिसरात ट्रान्स्पोर्ट व्यवस्था, सरकारी बसेस अशा अधिकृत वाहतूकीच्या सेवांचा विचार म्हणजे सक स्वप्नरंजन ठरते. कराड ग्रामीणचा परिसर हा शहराला अगदीच लागून आहे. तसेच या परिसरातील रस्ते अरूंद, चिंचोळे, आणि खड्डयांनी भरलेले असल्याने प्रवासी व माल वाहतूकीची मोठी वाहने या परिसरात फिरणे अशक्य आहे. या परिसरात कोणतेही उद्योगधंदे, कारखानदारी, व्यापारी पेठ नसल्यामुळे माल वाहतूकीची वाहने विरळाच आहेत. बांधकामाच्या मालाची वाहतूक करणारी छोटी वाहने, ट्रॅक्टर, सहा आसनी व तीन आसनी रिक्षा अशा वाहनांमधूनच काय ती माल आणि प्रवासी वाहतूक चालू आहे.

परंतु या समस्येवर मात्र कोणतीही उपाययोजना किंवा प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न झालेले नाहीत. अपवाद म्हणून मागील काही वर्षांमध्ये बस स्टॅण्ड ते कन्या शाळामार्गे वाखाण रस्ता अशी एक बस सुरू झालेली होती. परंतु नंतर ती बस सेवासुद्धा बंद झाली.

कराड नगरपालिकेकडे प्रवासी वाहतुकीचे ट्रान्स्पोर्ट खाते नसल्याने नगरपालिकेमार्फतसुद्धा प्रवासी वाहतूकीची एखादी व्यवस्था उपलब्ध झालेली नाही. अर्थात कराड ग्रामीणमधील इतर समस्या सोडविण्यासाठी जे प्रयत्न झाले त्या तुलनेत माल आणि प्रवासी वाहतुकीच्या समस्या सोडविण्यासाठी अजिबात प्रयत्न झालेले दिसत नाहीत.

**ज. टाऊन प्लॅनिंग, बांधकाम नियंत्रण, इ. -**

कराड ग्रामीणमध्ये टाऊन प्लॅनिंग आणि बांधकाम नियंत्रणाच्या बाबतीतला प्रश्न अतिशय गंभीर स्वरूपाचा आहे. किंबहुना कराड ग्रामीणमधील सर्व समस्यांची जननी किंवा मूळ इथेच दिसून येते. कराड शहर हद्दीत १५-५-१९५६ पासून टाऊन प्लॅनिंगला मंजूरी मिळालेली आहे. परंतु कराड ग्रामीणमध्ये मात्र टाऊन प्लॅनिंग किंवा

बांधकाम नियंत्रणाची कोणतीही व्यवस्था नाही. कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात नसल्यामुळे टाऊन प्लॅनिंग किंवा बांधकाम नियंत्रण करायचे कोणी? हा प्रश्न आहे. कराड ग्रामीणमधील काही नियोजित व टी.पी.च्या पूर्व परवानगीने उभारलेल्या कॉलन्या सोडल्यास बहुतांश भाग हा शेतीचा किंवा कृषक आहे. ज्या जमिनी, कॉलन्या अकृषक किंवा बिगरशेती केलेल्या आहेत तेथील बांधकामावर नगररचना कार्यालय, सातारा (टी.पी. ऑफीस) याचे नियंत्रण आहे. उरलेल्या जमिनींची नोंद शेती किंवा कृषक अशी असल्याने त्यावर टी.पी. ऑफीसच्या नियंत्रणाचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळेच कराड ग्रामीणमधील वस्त्या, वसाहती, अनियंत्रित, ओंगळ व झोपडपट्टी सदृष्य असल्याचे दिसते.

घरे बांधणाऱ्यांना कोणाच्याही परवानगीची आवश्यकता नाही. गुंठेवारीनुसार जमिनीचा तुकडा विकत घेऊन मनाला वाटेल तसे बांधकाम करतो. घर बांधल्यानंतरसुद्धा त्यावर बिगरशेती कर, घरफाळा, बांधकाम कर असे कोणतेही कर भरावे लागत नाहीत. त्याचबरोबर बांधलेल्या घरांची ७/१२ किंवा कोणत्याही उताऱ्यावर नोंद होत नाही. त्यामुळे नोंदी आणि अधिकृत कागदपत्रांअभावी नागरिकांची प्रचंड फरपट होते. सहकारी व राष्ट्रीयकृत बँकांमधील कर्ज प्रकरणे, मॉरगेज, गहाणवट, अशा सर्व व्यवहारांमध्ये अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. त्याचबरोबर शासकीय योजनेतून कोणालाही घरकुले किंवा सेवा मिळत नाही. परिणामी झोपडपट्टी सदृश्य बकाल, गलिच्छ, घाणेरड्या वसाहतींचे चित्र निर्माण झाले आहे.

या परिस्थितीवर नियंत्रण आणण्यासाठी हा परिसर एखाद्या स्वयंशासनाच्या हद्दीत समाविष्ट झाला पाहिजे किंवा येथे स्वतंत्र स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण झाली पाहिजे व स्वतंत्रपणे नगररचना विभागाकडून टाऊन प्लॅनिंग करून घेतले पाहिजे.

कराड नगरपालिकेने ज्यावेळी शहर हद्दवाढीचा प्रस्ताव सादर केला त्यावेळी हाच मुद्दा मध्यवर्ती मानलेला होता. कराड शहराच्या शेजारी गलिच्छ आणि अनियंत्रीत

वस्त्या निर्माण होत आहेत. तेथे नगरपालिका किंवा कोणत्याही संस्थेमार्फत विकासाची तरतूद नाही. तेथे टाऊन प्लॅनिंग होवून चांगली नगररचना निर्माण करण्याच्या उद्देशानेच शहरहद्दवाढीचा प्रस्ताव पाठविलेला होता. त्यातून रस्ते, गटारे, दिवाबत्ती, भुयारी गटारे अशा सुविध्णा देता येतील व लोकांचे जीवन सुखी होईल हीच भूमिका कराड नगर परिषदेची होती.[३२] परंतु या शहर हद्दवाढीला अनेक लोकांनी विरोध करून हा प्रयत्न हाणून पाडला व कराड ग्रामीणमधील टाऊन प्लॅनिंग आणि बांधकाम नियंत्रणाचा प्रश्न लोंबकळत राहिला.

## ३.१० कराड ग्रामीण भागातील नागरी सुविधांचा प्रश्न - निष्कर्ष -

कराड ग्रामीणमधील त्रिशंकू भाग आणि त्यातील नागरी सुविधांचा अभाव आणि त्या समस्या सोडविण्यासाठी झालेले प्रयत्न त्यातून निर्माण होत असलेला एकूणच कराड ग्रामीणचा चेहरामोहरा, भविष्यकाळात कराड ग्रामीणची असणारी ओळख यासंदर्भातील अनेक प्रश्नांनी कराड ग्रामीणमध्ये राहणारा सामान्य माणूस ग्रासलेला दिसतो. दैनंदीन जीवन जगत असताना नागरी समस्यांना तोंड देता देता त्याची होणारी दमछाक आणि स्वयंशासन किंवा विलीनीकरण या संदर्भातील अस्थिरता यातून त्याच्या मानसिकतेची होत असलेली जडणघडण, राज्यकर्ते शासन यांची भूमिका या सर्व गोष्टींचा या प्रकरणात आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

कराड ग्रामीणमधील नागरी सुविधांचा प्रश्न हा जेवढा व्यापक आहे तेवढाच तो किचकट आणि जटिल आहे. या परिसराचे सामिलीकरण किंवा स्वयंशासन याचा प्रश्न केव्हा सुटायचा आहे तेव्हा सुटो पण सध्या तेथे असलेल्या समस्या सोडविण्याच्या बाबतीत मात्र कोणीही गंभीर दिसत नाही. शासन आणि लोकप्रतिनिधींमार्फत होणारे प्रयत्न अतिशय तुटपुंजे आणि श्रेयवादाचे दिसतात. तसेच दुसरी बाजू पाहिली तर तिथे राहणारे नागरीकदेखील या समस्येच्या संदर्भात म्हणावे तेवढे जागृत व जागरूक दिसत नाहीत. नागरी समस्या एवढ्या भयंकर आणि व्यापक असताना त्या सुटल्याच पाहिजेत तो या भारताचा नागरीक म्हणून त्याला सुरक्षितपणे जीवन जगण्याचा अधिकार आहे

आणि म्हणूनच या समस्या तो सहन करणारच नाही अशी भूमिका नागरीक घेताना दिसत नाहीत. त्यामुळे समस्या सोडवायच्या कशा हा एक गहण प्रश्न बनला आहे.

लोकप्रतिनिधींचा मर्यादित विकासनिधी शासनाच्या मर्यादित विकास योजना कराड नगरपरिषदेच्या अधिकारांवरील मर्यादा आणि मग कराड ग्रामीणमधील समस्यांचा डोंगर याचा मेळ कुठेच बसत नाही आणि त्यातूनच तेथील नागरिकांच्या मनामध्ये सुधारणा आणि विकासाच्या बाबतीत औदासिन्य निर्माण झाले आहे.

नळपाणी पुरवठा, भुयारी गटार, शैक्षणिक सुविधा, मैलासफाई, दिवाबत्तीची समस्या, गटारांची समस्या इ. अनेक समस्यांनी ग्रासलेल्या या भूप्रदेशाच्या सर्वांगीण विकासाला सर्वस्वी जबाबदार असणारी एकही यंत्रणा या परिसरामध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे या समस्या सोडविण्यासाठी जो काही थोडाफार प्रयत्न होत आहे त्यापेक्षा समस्यांचे गांभीर्य दिवसेंदिवस वाढत आहे.

कराड नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये समावेशाच्या प्रक्रियेची धीमी गती, त्या वाटेत निर्माण होणारे अडथळे किंवा स्वयंशासित संस्था स्थापनेसाठी झालेली सुरूवात आणि भविष्यकाळात ते अस्तित्वात येण्यासाठी लागणरा कालावधी याचा विचार करता कराड ग्रामीणमध्ये दोन्हीपैकी कोणताही निर्णय जवळपासच्या कालावधीत होईल अशी आशा वाटत नाही. त्यामुळे कराड ग्रामीणमध्ये भविष्यात निर्माण होणाऱ्या नागरी सुविधांविषयी विचार करणे म्हणजे केवळ कल्पनाविलास किंवा स्वप्नरंजन ठरते.

**संदर्भ -**


१. माजी नगराध्यक्ष श्री पी. डी. पाटील यांची मुलाखत.

२. माजी जिल्हा परिषद सदस्य श्री गोपाळराव धोकटे यांची मुलाखत.

३. उपरोक्त.

४. कराड पंचायत समिती, कराड सदस्या श्रीमती शिला रसाळ यांची मुलाखत.

५. मलकापूर नगरपंचायतीचे उद्घोषणेवर कराड नगरपालिकेची हरकत, पृ. २.

६. माजी विधान परिषद आमदार भास्करराव शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य श्री गोपाळराव धोकटे, माजी जिल्हा परिषद सदस्य, श्री जगदीश जगताप, विद्यमान जिल्हा परिषद सदस्या विद्याताई जगताप यांची प्रत्यक्ष मुलाखत.

७. माजी नगराध्यक्ष श्री पी. डी. पाटील यांची मुलाखत.

८. माजी जिल्हा परिषद सदस्य श्री गोपाळराव धोकटे यांची मुलाखत.

९. माजी नगराध्यक्ष श्री पी. डी. पाटील यांची मुलाखत.

१०. माजी आमदार भास्करराव शिंदे यांची मुलाखत.

११. माजी जिल्हा परिषद सदस्य श्री जगदीश जगताप व विद्यमान जिल्हा परिषद सदस्या सौ. विद्याताई जगताप यांची मुलाखत.

१२. माजी आमदार श्री भास्करराव शिंदे यांची मुलाखत.

१३. उपरोक्त.

१४. दै. पुढारी - आपला सातारा दि. ३१/१/२००७, पृ. ३.

१५. माजी आमदार श्री भास्करराव शिंदे यांची मुलाखत.

१६. माजी जिल्हा परिषद सदस्य श्री गोपाळराव धोकटे यांची मुलाखत.

१७. खासदार स्थानिक विकास कार्यक्रम माहितीपत्रक, पृ. २.

१८. जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे पत्र जा.नं. जि.प.क./बांध/तांत्रिक/३२०/०७ जि.प. बांधकाम उपविभाग, कराड दि. २३/५/२००७, पृ. १.

१९. महाराष्ट्र जीवन प्राधीकरण बांधकाम उपविभाग क्र. १ कराड यांचे माहितीपत्र जा.क्र. ना.शा.१/जनरल/१७६/ २००७ दि. २४/५/२००७, पृ. १.

२०. उपरोक्त.

२१. जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे पत्र, पृ. १.

२२. महाराष्ट्र जीवन प्राधीकरण सुधारित योजनेची माहिती देणारी टिप्पणी, पृ. १.

२३. उपरोक्त, पृ. २.

२४. उपरोक्त, पृ. ३.

२५. उपरोक्त, पृ. ५.

२६. नगर परिषदेची जाहीर सूचना, दै. पुढारी- दि. २६/५/२००५, पृ. ४.

२७. मलकापूर नगरपंचायतीचे उद्घोषणेवर कराड नगर परिषदेची हरकत, पृ. १ व २.

२८. दै. पुढारी - आपला सातारा दि. ३१/१/२००७, पृ. ३.

२९. माजी जिल्हा परिषद सदस्य श्री जगदीश जगताप यांची मुलाखत.

३०. उपरोक्त.

३१. उपरोक्त.

३२. माजी नगराध्यक्ष श्री पी. डी. पाटील यांची मुलाखत.